३४ वर्ष
यशस्वी वाटचाल
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष पहिले । अंक अकरावा । ऑगस्ट २०२३

जाती-धर्माच्या संकुचित विचारापलीकडे जाऊन सर्व सामाजिक घटकांसाठी कार्य करणारी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना आहे. अंनिसची खरी ताकद नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रत्यक्ष अंधश्रद्धांना भिडणे ही आहे. अंधश्रद्धा निर्मूलन ते विवेकवादापर्यंतची वाटचाल कार्यकर्त्यांनी आत्मसात करणे व त्यानुसार व्यवहारात स्वतः कृतिशील राहणे व ती इतरांपर्यंत पोहोचविणे, यासाठी प्रयत्न करावे लागतील. विवेकी विचार समाजात रुजवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

**शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर**



## डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खूनाला दहा वर्षे... अजून तपास चालू?

# राज्यव्यापी युवा संवाद परिषद
# ‘प्रेम आणि हिंसा’

‘महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती’च्यावतीने पुणे येथील विद्यार्थीगृहाच्या सभागृहात ‘प्रेम आणि हिंसा’ या विषयावरील युवा संवाद परिषद दि.१० जुलै २०२३ रोजी उत्साहात संपन्न झाली. परिषदेचे उद्घाटन विद्यार्थीगृहाचे कार्याध्यक्ष सुनील रेडेकर यांनी केले, तर परिषदेचे अध्यक्षस्थानी महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस संजय बनसोडे होते. बीजभाषक म्हणून महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी मनोगत व्यक्त केले. विधितज्ज्ञ ॲड.रमा सरोदे यांनी ‘प्रेम आणि बरेच काही’, ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ.अनिल डोंगरे यांनी ‘प्रेमा तुझा रंग कसा’ तर महा. अंनिस महिला विभागाच्या राज्यकार्यवाह आरती नाईक यांनी ‘लव्ह आझाद है’ या विषयावर मांडणी केली. यावेळी पुण्यामधील जीवघेण्या हल्ल्यातून मुलीला वाचवणाऱ्या लेशपाल जवळगे याचा गौरव करण्यात आला. जोडीदाराची विवेकी निवड या विभागाचे राज्यकार्यवाह हर्षल जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक, विशाल विमल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तर शाम येणगे यांनी आभार मानले.

मयूर पटारे, ॲड. परिक्रमा खोत, अरिहंत अनामिका, माधुरी गायकवाड यांनी याप्रसंगी गाणी सादर केली. सम्यक वि. म., विनोद लातूरकर, स्वप्नील भोसले, संजय बारी यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. मनोज बोरसे, वनिता फाळके, श्वेता सूर्यवंशी, नितीन पाटील, कविता धोत्रे, अनुष्का कावले यांनी ठराव मांडले. तर्कशील सोसायटीचे सुभाषचंद्र सैनी, राज्य सरचिटणीस सुधाकर काशीद उपस्थित होते. रविकिरण काटकर, प्रियांका खेडेकर, उदय कदम, डॉ. ठकसेन गोराणे, श्रीनिवास शिंदे, अक्षय दावडीकर, मृणालिनी पवार, महेश गुरव, जुनेद सैय्यद, प्रतिक कालेकर, किर्तीवर्धन तायडे, एकनाथ पाठक, संदीप कांबळे, सदाशिव फाळके यांच्या सहभागाने परिषद यशस्वी झाली.



**ॲड. रमा सरोदे :** प्रेमातील नकार स्वीकारण्याची तयारी ठेवली पाहिजे. महिलांवर सत्ता गाजवणे आणि मालकीहक्क सांगण्याच्या प्रवृत्तीतून हिंसा घडत आहेत. कोणत्याही स्त्री–पुरुषांच्या नात्यांमध्ये स्पेस आणि स्पष्टता असली पाहिजे. कोणत्याही क्षणी नाही म्हणण्याचा कायदेशीर अधिकार मान्य केला पाहिजे. महिलांच्या बाबतीत जास्त शंका घेत त्यांनाच दोषी ठरवण्यासंदर्भात समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे.



**डॉ.अनिल डोंगरे :** प्रेम, वासना आणि शारीरिक आकर्षण यामधील फरक समजून घेतला पाहिजे. वासनामध्ये फक्त शारीरिक विचार केला जातो. आकर्षणामध्ये शारीरिक आणि भावनिक मुद्दे असतात. प्रेम ही दीर्घ प्रक्रिया आहे. पाहिल्या नजरेत कधी प्रेम होत नाही, तर ते फक्त आकर्षणच असेल. प्रेमाला विवेकाची जोड द्यावी लागते. प्रेम हे मुरंब्यासारखे असते, तर आकर्षण हे फास्टफूड सारखे असते. प्रेमात समानता आणि व्यक्तीचा अधिकार जपावा लागतो. नकार देताना स्पष्ट शब्दात दिला पाहिजे; मात्र त्या व्यक्तीचा अपमान होणार नाही याचीही दक्षता घेतली पाहिजे. प्रेमासाठी वाट्टेल ते करीन यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे. प्रेम करा; पण प्रेमासाठी प्राण प्रियेचा घेऊ नका.




**आरती नाईक :** प्रेमात सन्मान हवा ती सिद्ध करण्याची गरज नसावी. प्रेम आत्मविश्वास आणि जगण्याचे बळ देते. लव्ह जिहादचा बाऊ केला जात आहे, प्रेम करणाऱ्यांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न होत आहे. प्रेमातील निवडीचे स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे. लिंग समभावाचं मूल्य जोरकसपणे रुजवले पाहिजे. कुटुंबामधील मोकळेपणाने होणारा संवाद हा प्रेमाला निश्चितपणे पूरक ठरेल. प्रीतीमध्ये भीती असू शकत नाही. मानवी मूल्यांचा जागर करायला हवा.

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे
मुखपत्र

# अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष पहिले । अंक अकरावा**
**ऑगस्ट २०२३**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** ४
- **संघटना स्थापना दिन**
  महा. अंनिस भर तारुण्यात / माधव बावगे ५
- **अभिवादन**
  प्रिय डॉक्टर... / विनायक सावळे ८
  निष्णात कबड्डीपटू : डॉ. नरेंद्र दाभोलकर / संजय बनसोडे १०
  या नेतृत्व गुणाला काय म्हणावे? / प्रा. परेश शाह १३
  आठवणीतील शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर / मच्छिंद्रनाथ मुंडे १५
  ... आणि आईच्या डोळयातून अश्रू आले ! / प्रकाश कांबळे १८
  पुरोगामी चळवळीतील चौफेर व्यक्तिमत्त्व / नितीन राऊत २०
  डॉक्टर तुमची खुप आठवण येते! / उत्तरेश्वर बिराजदार २२
- **विज्ञान विश्व**
  विज्ञान संपते तिथे.../जगदीश काबरे २५
- **जडणघडण**
  माझा अंनिसमधील प्रवेश/ प्रा. डॉ. दशरथ भिसे २७
- **नाट्य परीक्षण**
  सफरचंद : सलोखा अधोरेखित करणारे नाटक / उत्तम जोगदंड २९
- **महा. अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३१
- **गणितप्रेमी** / सुरज उर्मिला सुनील ३७
- **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८


'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhashradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे

- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली-४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in

- **अंक वितरण**
  अरबाज पटेल
- **मुखपृष्ठ**
  विजय नांगरे/इस्लामपूर

- **स्वागतमूल्य : ₹ २०/-**
- **पृष्ठ संख्या : ४०**

## ।। सं पा द की य ।।

### गरज आहे वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्याची

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे अध्वर्यू आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून होऊन दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या दहा वर्षांमध्ये अनेक सामाजिक स्थित्यंतरे झाली. डॉ. दाभोलकरांच्या पाठोपाठ सामाजिक चळवळीशी निगडित असणाऱ्या कॉ. गोविंद पानसरे, गौरी लंकेश, एम. एम. कलबुर्गी या विचारवंतांचेही प्रतिगामी शक्तींनी निर्घृण खून केले. खून करणाऱ्यांना आजपर्यंत ना शिक्षा झाली ना त्यांच्या खुनाचे सूत्रधार जगासमोर आले. आरोपींना शिक्षा देण्यामध्ये आपल्या यंत्रणा अपयशी ठरल्या. याबाबत न्याय होऊ न देणारी यंत्रणाच या तपास यंत्रणेमध्ये आहे की काय अशी शंकेची पाल मनामध्ये चुकचुकते. निर्ढावलेल्या प्रतिगामी शक्ती किती थंड डोक्याने विचारवंतांचा खून करतात आणि तो पचनी पाडून घेतात याची प्रचीती समाज यानिमित्ताने घेतो आहे. वास्तविक पाहता हे लांच्छनास्पद आहे.

आज प्रसार माध्यमांच्याद्वारे अवैज्ञानिक गोष्टींचं उदात्तीकरण केले जात आहे. भावनिकतेची साद घालत धर्मावर घाला येतोय, अशा प्रकारच्या वावड्या उठवल्या जात आहेत. हे जाणीवपूर्वक घडवलं जात आहे, हे न समजण्याइतका समाज भाबडा नाही. परंतु त्याविरुद्ध ठामपणे बोलण्याचं धाडस आज होताना दिसत नाही. धर्माधर्मामध्ये भेद निर्माण करण्याबरोबरच दैववादाचा प्रसार जास्त जोमाने होतो आहे. एवढंच नाही, तर त्याला मिळणारे राजकीय आणि सामाजिक पाठबळ सुद्धा चिंताजनक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित अवकाशाचा वेध घेणारी भारतीय अंतराळ संशोधन संस्थासुद्धा आज दैववादाच्या आहारी गेलेली दिसून येत आहे. चांद्रयान ३ मोहिमेच्या माध्यमातून चंद्राला गवसणी घालण्याच्या प्रयत्नाला यश यावं यासाठी इस्रोची टीम तिरुपती बालाजीच्या चरणी चांद्रयानाची प्रतिकृती अर्पण करत प्रार्थना करते, यासारखा विनोद दुसरा असूच शकत नाही. भावी पिढीला आपण काय देत आहोत. याचा विचार करण्याची गरज आहे. सत्तेच्या अधीन असणाऱ्या संस्था कोणाची तरी मर्जी सांभाळण्यासाठी असं करत नाहीत ना? अशी शंका येते. असं केलं म्हणून काय बिघडलं, असं म्हणत अशा प्रकारांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. डॉक्टरांची याप्रसंगी प्रकर्षाने आठवण होते. सध्याच्या परिस्थितीत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसार करणं किती कठीण आहे, याची प्रचीती या प्रसंगाने येते.

संघटनेच्या नेत्याच्या निर्घृण खुनानंतर त्या संघटनेचा जोर मंदावतो हा इतिहास असतानाही डॉक्टरांच्या जाण्यानंतर महा. अंनिस नेस्तनाबूत न होता उलट ती जास्त जोमाने विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत राहिली. समाजाच्या सर्व स्तरात काम करीत राहिली. याचे श्रेय डॉक्टरांच्या संघटनात्मक बांधणीच्या कौशल्याला आणि कार्यकर्त्यांच्या विजिगीषु वृत्तीला द्यावं लागेल. निष्णात कबड्डीपटू असलेला हा खेळाडू सामाजिक क्षेत्रामध्ये सुद्धा तेवढ्याच त्वेषाने आणि संयमाने सामोरं जात होता. आपल्या संवाद कौशल्याच्या जोरावर अत्यंत भावनिक आणि श्रद्धेशी निगडित असणारा 'अंधश्रद्धा' या विषयाबद्दल जनसामान्यांना डोळस करण्यात डॉक्टरांचे योगदान अनन्यसाधारण आहे. हा विषय चळवळीचा विषय असू शकतो हे त्यांनी समाजमनावर बिंबवले. संघटनेला एवढ्या एकाच विषयापुरते सीमित न करता चतुःसूत्रीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून दिले. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या अत्यल्प असली तरी संत समाजसुधारकांचा वारसा ते नेटाने पुढे नेत आहेत. हे निश्चितच कौतुकास्पद आहे. हे काम असेच पुढे चालू ठेवण्याचा निर्धार करणं हीच डॉ. दाभोलकरांना खरी आदरांजली ठरेल.

**संपादक : डॉ. नितीन शिंदे**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# महा.अंनिस भर तारुण्यात

**माधव बावगे,** लातूर
९४०४८७०४३५

९ ऑगस्ट, ३४ वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने...

९ ऑगस्ट, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा ३४वा वर्धापन दिन. ऑगस्ट महिना हा संघटनेसाठी एका बाजूला वर्धापन दिनामुळे आनंदाचा तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा निर्मूलनाचे अर्ध्वयू डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा खून याच महिन्यात झालेला असल्याने त्यास दुःखाची किनार आहे. २० ऑगस्ट २०२३ रोजी डॉ. दाभोलकरांचा सनातन्यांनी खून केला त्याला यावर्षी १० वर्षे पूर्ण होत आहेत. खूनानंतर जादूटोणा विरोधी कायदा मंजूर झाला त्यालाही १० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्तानं या दशकातील संघटनेच्या कामाचा थोडक्यात मागोवा घेण्याचा प्रयत्न.

बी. प्रेमानंद यांच्या दौऱ्याने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाला प्रेरणा मिळाली. बी. प्रेमानंद यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कारामागील विज्ञानप्रयोगाच्या माध्यमातून दौऱ्यात प्रभावशाली मांडणी केली तेव्हा महाराष्ट्रातील विज्ञानवादी लोकांना हे काम अतिशय महत्त्वाचे वाटल्याने महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाने काम सुरू झाले. कालांतराने त्यात काही मतभेद निर्माण झाल्याने दाभोलकर यांनी ९ ऑगस्ट १९८९ ला 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' चे काम सुरू केले. त्याला ९ ऑगस्ट २०२३ रोजी ३४ वर्षे पूर्ण होतात. कुठल्याही शासकीय, निमशासकीय, परदेशी अनुदानाशिवाय केवळ लोकसहभागातून काम उभा राहाणं, ते विस्तारणं आणि सलग ३४ वर्षे संघटितपणे चालणं ही चळवळीच्या दृष्टीने फार मोठी उपलब्धी आहे. (१) शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या सर्व अंधश्रद्धांना विरोध करणे. (२) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार प्रचार आणि प्रसार करणे. (३) धर्माची कठोर पण कालसुसंगत विधायक चिकित्सा करणे. (४) पुरोगामी, परिवर्तनवादी संस्था, संघटना कार्यकर्ते यांना सोबत घेऊन मूल्यपरिवर्तन घडवून आणणे. ही चतुःसूत्री ठरवून अगदी मूठभर कार्यकर्ते सोबत घेऊन संघटनेचे काम सुरू झाले. विवेकी विचाराच्या आधारे नीतीमान समाजनिर्मिती करण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र पिंजून काढला. समर्पित कार्यकर्त्यांचं जाळं विणलं आणि महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून संघटनात्मक विस्तार केला. डॉ. दाभोलकर हे एक प्रभावी वक्ते, उत्तम लेखक, कुशल संघटन कौशल्य, सर्वांना सोबत घेऊन जाणारा, अत्यंत संयमी अभ्यासू, दूरदृष्टी या सर्व गुणांचा समुच्चय असणारे अष्टपैलू नेतृत्व होते. डॉ. दाभोलकरांनी कौशल्याने असंख्य साथींना सोबत घेऊन संघटना वाढविली आणि सक्षम केली.

डॉ. दाभोलकरांचे विवेकी विचारांच्या प्रसाराचे काम काही इथल्या हितसंबंधी, धर्मांध, सनातनी प्रवृत्तींना ते रुचलं नाही. विचारांची लढाई विचारांनी लढता आली नाही म्हणून त्यांनी डॉ. दाभोलकरांचा २० ऑगस्ट २०१३ रोजी खून केला. विवेकी विचारांसाठी डॉक्टरांना बलिदान द्यावे लागले. संघटनेचा नेता संपवला की संघटना संपेल या हेतूने सनातन्यांनी डॉक्टरांचा खून केला. पण डॉक्टरांच्या पठडीत तयार झालेले कार्यकर्त्यांनी यांनी १ सप्टेंबर २०१३ रोजी सातारा येथे राज्यव्यापी निर्धार मेळावा घेऊन 'आम्ही सारे दाभोलकर' असा निर्धार केला आणि सर्व जुन्या नव्या कार्यकर्त्यांनी अविनाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली एका बाजूला संघटनात्मक सशक्तीकरण आणि दुसऱ्या बाजूला खूनाच्या तपासाबाबत राज्य आणि देशपातळीवर सततचा पाठपुरावा हे काम अत्यंत निष्ठेने सुरू ठेवले. आपल्या नेत्याचा विवेकी विचारांचा वारसा वृद्धिंगत करण्याचा ध्यास घेऊन कामाला लागले. आजमितीला महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांत ३५० हून अधिक शाखांच्या माध्यमातून संघटनेने विस्तार करून डॉक्टरांना कृतीशील आदरांजली वाहिली आहे. प्रकाशन विभाग व संघटनेच्या मुखपत्रासाठी स्वतंत्र ट्रस्ट उभा करण्याचा मनोदय डॉ.

दाभोलकरांनी व्यक्त केला होता. त्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर 'विवेक जागर विश्वस्त संस्था' सुरू करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी प्रचलित कामापेक्षा विविध समाजोपयोगी कामाचा डोंगर उभा केला होता. त्यांच्या जाण्यानंतरही काम थांबले नाही किंवा मंदावले नाही. उलट अधिक जोमाने सुरू आहे. संघटनेच्या चतु:सूत्रीमध्ये एक सूत्र वाढवले. ते पाचवे सूत्र म्हणजे 'संत समाजसुधारकांच्या विचारांचा कृतिशील वारसा आणि भारतीय संविधानाचा.

जादूटोणाविरोधी कायदा मंजुरीसाठी विविध अनोख्या पद्धतचे अनेक आंदोलने अथकपणे केले. सलग अठरा वर्षे संघर्ष करूनही कायदा होत नव्हता म्हणून संपूर्ण राज्यातून जादूटोणाविरोधी कायदा मंजूरी निर्धार मोहीम राबवण्यात आली. त्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर व माधव बावगे यांनी लातुरात गांधी पुतळ्यासमोर सलग १० दिवसांचे उपोषण केले. शेवटी डॉ. दाभोलकर यांच्या खूनानंतर शासनाने वटहुकूम मंजूर केला जात नसतो. नागपूर अधिवेशनात जादूटोणाविरोधी कायदा मंजूर केला. तेव्हा नुसतं कायदा करून भागणार नाही तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी महा.अंनिसने स्वबळावर कायद्याचा प्रचार-प्रसारासाठी सामान्य व्यक्तीसाठी तीन ठिकाणी प्रशिक्षण शिबिरे घेतली. आवश्यक ते प्रचार साहित्य तयार केले. महाराष्ट्राच्या ३५ जिल्ह्यांत ८५ दिवसांची जादूटोणाविरोधी कायदा प्रभावी अंमलबजावणी जनसंवाद यात्रा काढण्यात आली. महाराष्ट्र शासन पुरस्कृत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व महा.अंनिस यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सर्व महसूल विभागनिहाय सामान्य व्यक्तींचे प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे वर्ष आले तरीही राज्यात आणि देशात जातपंचायतींच्या समांतर न्यायव्यवस्था अस्तित्वात आहेत. महा.अंनिसने पहिल्यांदा या प्रश्नाला हात घातला. समितीच्या सततच्या पाठपुराव्यामुळे 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' मंजूर करण्यास समितीने यशस्वी प्रयत्न केले. अंनिसच्या पाठपुरावा, सहकार्यामुळेच कर्नाटकात व दक्षिण आफ्रिकेत युगांडा मध्ये जादूटोणा व नरबळी विरोधी कायदा मंजूर झाला. या दोन्ही कायद्यांबाबत कार्यकर्ते हे कर्तव्यभावनेने सातत्याने प्रबोधन करीत आहेत.

अनिष्ट अघोरी प्रथाविरुद्ध राज्यव्यापी परिषद ९ डिसेंबर २०१४ (वर्धा), जातीय अत्याचार विरोधी परिषद २० जुलै २०१४ (अहमदनगर), भारतातील विवेकवाद्यांची राष्ट्रीय परिषद व रौप्यमहोत्सवी अधिवेशन ७ ते ९ ऑगस्ट २०१९ (पुणे), नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड राज्यव्यापी परिषद १ व २ नोव्हेंबर २०१५ (नागपूर), १३ जानेवारी २०१९ (लातूर), गांधी १५० निमित्त राज्यस्तरीय कार्यशाळा २ व ३ सप्टेंबर २०१७ (वर्धा), २९ व ३० सप्टेंबर २०१८ (मुंबई), धार्मिक दहशतवाद व असहिष्णुता विरोधी राज्यव्यापी परिषद ९ व १० सप्टे.२०१८ (पुणे, मुंबई), जाती प्रथा व विविध समस्यांवर आधारित राज्यस्तरीय लघुपट निर्मिती प्रशिक्षण कार्यशाळा १६ सप्टे. २०१८(औरंगाबाद), त्रिदशकपूर्तीनिमित्त आंतरजातीय, आंतरधर्मीय सत्यशोधकी विवाहितांचां राज्यस्तरीय मेळावा १२ जाने. २०१९ (लातूर), डॉक्टरांच्या ९ व्या बलिदान दिनानिमित्त विवेक निर्धार मेळावा २० ऑगस्ट २०२२ (पुणे), अंधश्रद्धा निर्मूलन विदर्भस्तरीय प्रबोधन अभियान (चार टीम दोन भागात) १९ ते २३ सप्टें. २०२२, राज्यस्तरीय युवा महोत्सव ५ व ६ नोव्हें. २०२२ (लातूर), प्रेम आणि हिंसा परिषद ९ जुलै २०२३ (पुणे) या परिषदा सोबतच राज्यातील गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्यासंदर्भात लातूर, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यांतील प्रत्येक आत्महत्याग्रस्त कुटुंबात मानसमित्र मोहीम व दात्यांकडून थेट मदत मिळवून दिली (मार्च, एप्रिल १४).

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या स्मृती जागवण्यासाठी १५-१५ तरुणांच्या दोन टीम करून २६ नोव्हेंबर २०१६ ते ६ डिसेंबर २०१६ दरम्यान दादर मुंबई ते महू एक टीम व दुसरी टीम नागपूर ते औरंगाबाद संविधान जागर यात्रा काढण्यात आली. आंतरराष्ट्रीय परिषद घेण्याची डॉक्टरांची इच्छा होती. त्यासोबत दोन दिवसाचे अधिवेशन मुंबईत घेण्याचा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निर्धार पूर्ण केला. संघटना स्थापना दिनाचं औचित्य साधून ९ ऑगस्ट २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय पातळीवरची

मानवतावादाच्या विकासासाठी विवेकवाद या विषयावर परिषद घेतली. या परिषदेस तीन देशांतील आणि २३ राज्यांतील ७५० प्रतिनिधी उपस्थित होते. त्याला जोडून संघटनेचे दोन दिवसीय अधिवेशन. त्यात महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची भर पडून १२५० प्रतिनिधी मुंबईत उपस्थित होते. यानिमित्ताने सिंहावलोकन केले तर 'अंधश्रद्धा निर्मूलन' पासून सुरू झालेले हे काम शास्त्रीय विचार पद्धती–वैज्ञानिक दृष्टिकोन–धर्मचिकित्सा–धर्मनिरपेक्षता – विवेकवाद ते मानवतावादपर्यंत पोहोचले. जातिविरहित समाज निर्माण करण्याच्या हेतूने आंतरजातीय /आंतरधर्मीय विवाहास प्रोत्साहन म्हणून महा. अंनिसने आत्तापर्यंत ११०० हून अधिक आंतरजातीय/ आंतरधर्मीय विवाह लावून दिले आहेत. २०१६ पासून जोडीदाराची विवेकी निवड हा तरुणाईमध्ये अत्यंत आवडीचा विभाग महा. अंनिसने सुरू केलेला आहे.

डॉक्टरांच्या नंतरही संघटनेचे कार्यकर्ते त्यांचा विवेकी विचार कृतिशीलपणे पुढे घेऊन जात असल्याने या कामाची दखल घेऊन संघटनेला कॉ. गोविंद पानसरे पुरस्कार २०१७, प्रफुल्ल बिडवई स्मृती पुरस्कार (नवी दिल्ली) २०१७, तर्कशिल सोसायटी पंजाब, यांचा २०१८ चा, युक्तिवादी केंद्र कोची (केरळ) यांचा फ्री थॉट अवॉर्ड २०१९ इत्यादी, यु. आर. एल. फाऊंडेशन मुंबई यांचा पुरस्कार २०१९, फ्रीडम फ्रॉम रीलिजन या अमेरिकन संस्थेतर्फे अविजीत रॉय करेज अवॉर्ड २०१९ इत्यादी पुरस्काराने संघटनेला सन्मानित केलेले आहे. या यशात प्रत्येक कार्यकर्त्यांचा सहभाग आहे.

संघटनेची त्रिदशकपूर्ती मोठ्या दिमाखात साजरी केली. या नंतर काही महिन्यात संघटनातंर्गत मतभेद वाढले. कोरोना काळात प्रत्यक्षात भेटता येत नव्हते, संपर्क होत नव्हता, अशा स्थितीत संवादाअभावी मतभेद टोकाला गेले. संघटनेच्या वतीने सतत संवादाचा आग्रह धरला गेला मात्र दाभोलकर कुटुंबिय, ट्रस्टी यांनी अजिबात प्रतिसाद दिला नाही, पत्रव्यवहाराला दाद दिली नाही. अखेर संघटनेत विभाजन झालं. कुटुंबिय, ट्रस्टी आणि मोजके कार्यकर्ते एका बाजूला तर संघटनेचे कार्याध्यक्ष, कार्यकारी समिती, प्रमुख पदाधिकारी बहुसंख्य कार्यकर्ते दुसऱ्या बाजूला होते. मनाला वेदना देणारे हे विभाजन होते मात्र डॉ. दाभोलकरांचा वैचारीक वारसा पुढे घेऊन आम्ही नव्या उमेदीने काम सुरू केले.

वैचारकि वारसा, समर्पित कार्यकर्ते हेच भांडवल घेऊन पुन्हा नव्याने महा.अंनिसचे काम सुरू केले. घराणे शाहीला ठामपणे विरोध केला. संघटनेसाठी आवश्यक निधी जमविला. नवे मुखपत्र 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' नावाने सुरु केले. त्याला दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. अत्यंत वैविध्यपूर्ण, जोरकसपणे निष्ठेने काम सुरु आहे. संघटनेचे ३५ वर्षे ही सारे करण्याचा मनोदय आहे. डॉ. नरेंद्र दभोलकरांचे स्मरण प्रेरणादायी ठेऊन विवेकाचा आवाज बुलंद करण्यास कटिबंद्ध आहोत. वर्धापनदिनाच्या सदिच्छा!

'लढेंगे जितेंगे'

•

## वाचक प्रतिक्रिया

डॉ.आ.ह. साळुंखे (तात्या) यांना ऐकण्यासाठी कोल्हापूर येथील विस्तारीत राज्य कार्यकारिणी मध्ये आतूर झालो होतो. शब्दनशब्द कानात साठवुन, लिहून घेतले पण परतीच्या प्रवासात वही पावसाने भिजली अन् मी अतिशय नाराज झालो होतो. जूलैचा अंक हातात पडला आणि आ. ह. सरांनी कार्यकर्त्यांना केलेलं मार्गदर्शन संपूर्ण लेख प्रसिद्ध केला अन् अतिशय आनंद झाला. झपाटून पूर्ण लेख वाचला, पुन्हा एकदा वाचला. आपण हा लेख प्रसिद्ध केला अन् तात्यांना मनात साठवता आलं याबद्दल धन्यवाद...

– **भास्कर बनसोडे** (औरंगाबाद)

लेखक किशोर बेडकिहाळ यांचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लेख वाचला स्टालिनग्राडचा पोवाडा याबद्दल अप्रतिम माहिती लेखकांनी सांगितली आहे.

अगदीच हादरवून टाकणारी, थक्क करणारी, खूप छान. माहिती आमच्या ज्ञानामध्ये भर पडलेली आहे. वास्तविक असा अण्णाभाऊ साठेंचा इतिहास पाठ्यपुस्तकांमध्ये यायला हवा

**– राजन ताटे**, रसायनी (रायगड)

# प्रिय डॉक्टर...



**विनायक सावळे,** शहादा
९४०३२५९२२६

प्रिय डॉक्टर...

सस्नेह नमस्कार...

कसे आहात तुम्ही? मीच सांगू तुम्हाला? तर मग ऐका, आठवणीत तर आहात आम्हा सगळ्यांच्या; पण केवळ आठवणीतच नाहीत तर सोबत असता तुम्ही. भरपूर गप्पा करत असतो आम्ही तुमच्याशी. चर्चा करत असतो. बोलत असतो. बरंच काही सांगत असतो तुम्हाला. खूप काही विचारत असतो आणि अधिक मोकळं सांगायचं तर, भांडत पण असतो तुमच्याशी. तुम्ही तुमच्या नेहमीच्या पद्धतीने शांतपणे ऐकत असता. कधी कधी मिश्किलपणे हसत असता. म्हणून हा संवाद एकतर्फीपण वाटत नाही.

हे किती छान आहे निसर्गाचं. किती मोठी देणगी म्हणावी. ज्यांच्याशी आपल्या भावना आणि विचारांच्या तारा जुळलेल्या असतात... आतून आतून खोलपर्यंत गेलेल्या असतात.... त्यांच्याशी तुम्ही कधीही बोलू शकता. संवाद साधू शकता. मन मोकळं करू शकता. हे किती भारी आहे ना?

कार्यकर्ता आणि तुमचं नातं. क्या बात है... किती मोकळेपणा होता त्यात. प्रत्येकाला जवळचे वाटायचाच तुम्ही... मनातलं काहीही तुमच्याशी मोकळेपणाने शेअर करता यायचं.. म्हणून तुमचं भौतिक अस्तित्व जरी संपलेलं असलं... तरी सर्व कार्यकर्त्यांच्या मनात ते अजूनही तसंच जिवंत आहे... मला वाटतं, कार्यकर्तेच नाही तर अनेक पुरोगामी विचारांच्या संस्था, संघटना, व्यक्ती, पत्रकार, लेखक, विचारवंत या सगळ्यांच्या मनात तुम्ही असेच असणार... या सगळ्यांना आज अजूनही तुमच्याशी रूबरू होता येत असेल... किती आधार देणारं आणि प्रेरणा देणारं आहे हे.

आज दहा वर्षे लोटली डॉक्टर. २० ऑगस्ट २०१३ची ती सकाळ. भयानक बातमी. पण काळ किती वेगाने पुढे सरकतो ना. थांबत नाही जराही. सतत अखंडित धावत असतो. या दहा वर्षांत तुमचं विस्मरण तर झालं नाहीच... उलट विचार आणि कृती अशा दोन्ही पातळीवर विवेकाची पताका फडफडत ठेवली कार्यकर्त्यांनी. 'आम्ही सारे दाभोलकर', ही केवळ घोषणा नाही, तर तो जगण्याचा मंत्र झालाय. विचार आणि कृती दोन्ही पातळीवर तुम्ही आजही जिवंत आहात. आजच्या दिवशी बोलताना तुम्हाला हे सगळं सांगावंसं वाटलं. म्हणून आज हा पत्रसंवाद.

डॉक्टर, तसं बघितलं तर हा दहा वर्षांचा काळ अनेक अर्थाने अस्वस्थ करणारा होता. तुमच्याशिवाय उभं राहायचं होतं. संघटनेचं वैभव टिकवायचं किंबहुना वाढवायचं होतं. अशा प्रसंगी निराश होऊन, खचून, रडत जर बसला असता, तर तो अंनिसचा कार्यकर्ता कसला? वेदनेलाच आपली ताकद बनवून, कार्यकर्ते लढत राहिले. अधिक सृजनशील आणि अधिक उपक्रमशील बनून वाढविस्ताराच्या नव्या खिडक्या उघडत राहिले. वारसा हक्काच्या दबावाने, संघटना फुटीचा दुसरा धक्काही पचवत, निर्धाराने पुढे चालत राहिले. डॉक्टर, खरं सांगू तुम्हाला? हे इतकं सोपं नव्हतं आमच्यासाठी. पण उभे राहाण्यापलीकडे कुठलाही पर्याय आमच्यासमोर नव्हताच. वेदनेलाही अंतःस्थ ताकदीत परिवर्तित करता येते, हे मात्र आम्ही स्वतःच अनुभवलं.

डॉक्टर, तुम्ही म्हणायचे ना! संघटना वाढते म्हणजे संघटनेचं साहित्य वाढतं. तुम्हाला सांगायला किती आनंद होतोय बघा. आपलेच कार्यकर्ते आता लिहिते झाले आहेत. डॉ. नितीन शिंदे, डॉ. ठकसेन गोराणे, डॉ. सुशील मेश्राम, डॉ. माधुरी झाडे, मच्छिंद्र मुंडे सर, कृष्णा चांदगुडे, आरती नाईक आणि सहकारी या सर्व कार्यकर्त्यांनी वाचनीय असे लेखन केले आहे. यातील अनेकांच्या पुस्तकाच्या आवृत्त्या संपत आलेल्या आहेत. अजून काही कार्यकर्त्यांची पुस्तकं येत्या कालावधीत आपण प्रकाशित करणार आहोत. आपले कार्यकर्ते विविध विषयांवर अभ्यासपूर्ण असे लेखन करीत आहेत, किती समाधानाची बाब आहे. आपल्याला आपली स्वतंत्र 'विवेक जागर प्रकाशन संस्था' समृद्ध करायची आहे डॉक्टर. पण त्या दिशेने अजून खूप पल्ला गाठायचा आहे याची जाणीव

आहे. एका दिवशी आपण पुरोगामी चळवळीतले सगळ्यात समृद्ध प्रकाशन संस्था असू याबद्दल मात्र तीळमात्र शंका नाही. त्यासाठी आपलीच संघटना अंतर्गत ऊर्जा आपल्याला नीट वापरावी लागणार आहे.

डिजिटल तारांगण तर तुमचंच स्वप्न होतं डॉक्टर. कार्यकर्त्यांनीच कष्टाने उभं केलेलं तारांगण हे आपल्याकडे आता नाही. ते आपल्याकडून हिरावून घेण्यात आलं. पण या राज्य कार्यकारिणीत सर्व कार्यकर्त्यांनी तारांगण नव्याने खरेदी करण्याचा संकल्प सोडलेला आहे. लवकरच हा संकल्प आम्ही तडीस नेऊ. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा थेट प्रचार-प्रसार करणारा हा कार्यक्रम पुन्हा सुरू करू.

महाराष्ट्रभर विविध उपक्रमांची रेलचेल आहेच. अलीकडेच आपण जिल्हा कार्याध्यक्ष, प्रधान सचिवांची तीन टप्प्यात संघटना बांधणी, प्रशिक्षण शिबिरे संपन्न केली. ही शिबिरे खूप उत्तम आणि प्रेरणादायी झाली असा कार्यकर्त्यांचा अनुभव आहे. राज्य कार्यकारिणीच्या बैठका आपल्या तशाच दर्जेदार होत असतात आणि आनंदाची गोष्ट सांगू डॉक्टर! यातील एकाही राज्य कार्यकारिणीसाठी मध्यवर्तीला स्वतः खर्च करावा लागत नाही. आयोजक शाखा आणि जिल्हे स्वतः कष्टाने सर्व निधी उभा करतात. उत्तम असे नियोजन करतात. तुम्ही राहिले असते ना, तर त्या सर्वांना कौतुकाचं आणि 'तुमचा मला किती आधार वाटतो, तुमच्यामुळे संघटनेचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे', असं पत्र लिहिलं असतं.

बहुचर्चित इंदुरीकर महाराजांविरोधीचा खटला आपण उच्च न्यायालयात जिंकलो आहोत. अविनाशभाई पाटील आणि ॲड. रंजनाताई गवांदे यांचे यासाठी परिश्रम आहेत. त्याचप्रमाणे एकतर्फी प्रेमातून महाराष्ट्रात खून, हिंसेचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी अलीकडेच आपण 'प्रेम आणि हिंसा' यावर चांगली युवा परिषद पुण्यात घेतली. युवा वर्गात प्रेम, लिंगभाव, लैंगिकता, विवाह, हिंसा या सर्व विषयांवर मोकळेपणाने चर्चा करण्याची नितांत आवश्यकता आहे. आपला महिला विभाग, युवा विभाग आणि जोडीदाराची विवेकी निवड या तिन्ही विभागांच्या सहभागाने यावर आपण काम करीत आहोत. तरुणाईवर तुमचा खूप विश्वास होता ना डॉक्टर. तुम्ही देखील सतत तरुणांच्या गराड्यात असायचे. तरुणांसोबत काम करायला तुम्हाला खूप आवडायचं. तरुणांच्या सहभागाने तरुणांचे विषय आपण पुढे नेऊ इच्छित आहोत. त्याला छान प्रतिसाद देखील मिळत आहे.

अजून एक वेगळी गोष्ट सांगू तुम्हाला? 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' नावाने आपलं स्वतंत्र मासिक आपण सुरू केलंय. डॉ. नितीन शिंदे आणि उत्तम जोगदंड सर यांच्या नेतृत्वात एक छान टीम कार्यरत आहे. कोणत्याही मानधनाशिवाय कार्यकर्ते मेहनत करीत आहेत. कोणत्याही व्यवस्थापकीय यंत्रणेशिवाय एवढं मासिक आपण पाच हजार लोकांपर्यंत पोहोचवीत आहोत. अजय भालकर हा तरुण सहकारी त्यासाठी कष्ट करीत आहे. हे सारं बघून अभिमानाने तुमचा ऊर भरून आला असता. बाकी डाकीण, जातपंचायत, बुवाबाजी भांडाफोड, चमत्कारांचा पर्दाफाश, जादूटोणाविरोधी कायदा, सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा, विविध प्रबोधनाचे अभियान हे सारं सातत्याने सुरूच आहे.

सध्याची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती फार भयंकर आहे डॉक्टर. ज्यांचा हिंसेचा आणि द्वेषाचा इतिहास आहे, तीच विचारसरणी आज सत्तास्थानी आहे. माध्यमे, सरकारी स्वायत्त संस्था या साऱ्यांवरच आज सत्तेचे नियंत्रण आहे. समाजमाध्यमांचा वापर करून प्रचंड विखार समाजात पेरला जात आहे. पुरोगामी पक्ष, नेते, चळवळी यांना लक्ष्य केले जात आहे. अशा परिस्थितीत तुम्ही स्वस्थ बसला नसता डॉक्टर. नक्कीच महाराष्ट्र पिंजून काढला असता. 'हिंसा के खिलाफ मानवता की और' म्हणत, लोकशाही बळकट करण्याची मशाल महाराष्ट्राच्या गावोगावी पोहोचवली असते. काही पुरोगामी संस्था, संघटना, चळवळी हे काम आपापल्या क्षमतेने नक्कीच करीत आहेत. आपणही त्यात सामील आहोत. बाकी अजून काय सांगू डॉक्टर? खूप मिस करतो तुम्हाला. सतत आठवणीत असता तुम्ही. तुमच्यासोबत प्रत्यक्ष राहाता आलं, काम करता आलं, थोडंफार शिकता आलं, आम्हा कार्यकर्त्यांच्या जगण्याला दिशा मिळाली आणि उद्देश मिळाला. विवेकाची पताका घेऊन खांद्यावरी, कार्यकर्ते मानवतेची वाट अधिक विवेकी आणि समृद्ध करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. आयुष्यभर ही वाटचाल करण्याचा संकल्प, याहून अधिक योग्य आदरांजली दुसरी कोणती असणार तुम्हाला...

तुमचा
विनायक



# निष्णात कबड्डीपटू : डॉ. नरेंद्र दाभोलकर


**संजय बनसोडे,** इस्लामपूर
९८५०८९९७१३

डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येला ऑगस्ट २०२३ मध्ये एक दशक पूर्ण होत आहे. तरीही हत्येचा खटला न्याय मिळण्याच्या निर्णायक स्थितीला आलेला नाही. याबद्दल समाजात खेद व्यक्त होत आलेला आहे. या हत्येसंदर्भात न्यायप्रक्रिया पूर्ण व्हावी अशा भावना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीबरोबरच अनेक विचारवंतांनी व्यक्त केलेल्या आहेत.

समाजाला विवेकी बनविणारी, व्यापक परिवर्तनाची उद्दिष्टे गाठण्यासाठी विवेकनिष्ठ कार्यपद्धतीच्या कृतिशील अशा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेचे कुशल संघटक, संस्थापक कार्याध्यक्ष म्हणून डॉ. दाभोलकरांना ओळखले जाते. त्याचबरोबर ते सानेगुरुजींच्या 'साधना' साप्ताहिकाचा वारसा चालविणारे संपादक, सामाजिक कृतज्ञता निधीचे सचिव, लेखक, वक्ते, प्रबोधनकार, डॉक्टर म्हणून विविध क्षेत्रांत ख्यातनाम होते. परंतु नरेंद्र दाभोलकर हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट कबड्डीपटू होते हे फार थोड्या लोकांना माहीत आहे.

वयाच्या आठव्या वर्षापासून नरेंद्र यांना खेळाची आवड निर्माण झाली. त्यांनी कबड्डीसारखा देशी, रांगडा, तांबड्या मातीतील खेळ खेळण्यास सुरुवात केली. सातारा येथील श्री शिवाजी उदय मंडळात ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डीचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. गुरुवर्य बबनराव उथळे यांच्या पुढाकारातून आणि गुलाब भाई बागवान, आबासाहेब चव्हाण, पांडुरंग शिंदे, मामु खान यांच्या सहकार्याने १९४५ साली हे क्रीडा मंडळ स्थापन झाले. बालक आणि युवकांनी शारीरिक तंदुरुस्त राहावे, विविध खेळात निपुण व्हावे, कबड्डीसारख्या देशी खेळात अधिक प्रावीण्य मिळवावे याच हेतूने या मंडळाची स्थापना झाली. राज्यातीलच नव्हे तर देशातील नावलौकिक असणारे हे क्रीडा मंडळ अजूनही तितक्याच उत्साहाने आणि क्षमतेने कार्यरत आहे. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील असंख्य खेळाडू या मंडळाने तयार केले आहेत. त्यातील एक महत्त्वाचे खेळाडू म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोलकर होय.

शालेय जीवनापासूनच डॉ. दाभोलकर कबड्डीचा ध्यास घेऊन कबड्डीशी एकरूप होऊन पूर्ण निष्ठेने खेळत राहिले. ते दररोज न चुकता संध्याकाळी दोन ते तीन तास श्री शिवाजी उदय मंडळात जायचे. व्यायामात, खेळाच्या सरावात त्यांनी कधीही खंड पडू दिला नाही. मंडळात त्यांनी पूर्ण समर्पित भावनेने कबड्डी खेळातील कौशल्य आत्मसात केले. त्यांना या मंडळात योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे दिवसागणिक त्यांचा खेळातील विकास



होत राहिला. या खेळात लागते ती अत्याधिक चपळता. ती आधी असते मनात, नंतर ती शारीरिक पातळीवरील हालचालींमध्ये व्यक्त होते. या चपळतेचा उपयोग खेळात कसा करावा यासाठी लागते बुद्धी, ती सुद्धा नरेंद्र यांच्याकडे विपुल होती. त्यासाठी नरेंद्र अत्यंत निष्ठेने, सातत्याने कबड्डी खेळत राहिले. याच मंडळात त्यांना अनेक मित्र भेटले; ज्यांची साथसंगत त्यांना पुढील जीवनातही लाभली. नरेंद्रची उत्तम जडणघडण येथे झाली. मंडळातील सौहार्दपूर्ण वातावरणात त्याच्यातील खिलाडूवृत्ती, नेतृत्व गुण जोपासले गेले जे पुढे त्यांना आयुष्यभर उपयोगी पडले. गुरुजनांविषयी आदर व

कृतज्ञता राखत, समवयस्कांविषयी मैत्रीभाव जपत, आपल्यापेक्षा लहानांना जिव्हाळा देत ते लहानाचे मोठे झाले. याच ठिकाणी त्यांचा मनोविकास होत राहिला. शालेय वयातच ते कबड्डीमध्ये चमकले. कबड्डीतील त्यांच्या कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी शालेय जीवनातच विविध कबड्डी स्पर्धा गाजवल्या.

शालेय जीवनातच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्या दिवशीही मैदानाची वेळ होताच त्यांची पावले मैदानाकडे वळली. त्या कुमार वयातही वडील गेल्याचे दुःख उराशी असताना ते दुःख पचवून त्याही दिवशी मैदानात जाऊन सराव केला. एखाद्या ध्येयाविषयी समर्पित वृत्तीची अशीच भावना त्यांच्या संपूर्ण जीवनात त्यांनी अंगीकारलेल्या प्रत्येक सामाजिक कार्यात दिसून येते. त्यांचा मेहनती स्वभाव, चपळता, ताकद, मनाची एकाग्रता हे गुण त्यावेळच्या मंडळातील मार्गदर्शकांनी हेरले. हा मुलगा कबड्डीच्या क्षेत्रात सातारचा, मंडळाचा नावलौकिक वाढवेल, अशी त्यांना खात्री वाटू लागली. त्यामुळे ते मंडळातील महत्त्वाचा खेळाडू म्हणून त्यांच्याकडे पाहू लागले. अनेक सामन्यात त्यांनी त्यांच्या खेळाची चुणूक दाखवली होती. शिक्षण आणि खेळ यांची योग्य सांगड घालत नरेंद्र यांनी स्वतःला सिद्ध केले. तालुका, जिल्हास्तरावरील अनेक कबड्डी स्पर्धांमध्ये त्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. हे क्रीडा मंडळ त्यांच्या जीवनाचा अविभाज्य बनले होते. महाविद्यालयात विज्ञान शिक्षण घेत असतानाही त्यांचे कबड्डीबद्दलचे प्रेम तसूभरही कमी झाले नाही. उलट अधिक ताकदीने, पूर्ण क्षमतेने महाविद्यालय स्पर्धा त्यांनी गाजवल्या होत्या. एवढेच नव्हे तर एमबीबीएसचे शिक्षण सुरू असताना सुद्धा ते राज्यभरातील विविध स्पर्धांमध्ये खेळले होते, बक्षिसे मिळविली होती. महाविद्यालयीन काळात एक उत्कृष्ट कबड्डीपटू म्हणून त्यांचा राज्यभर नावलौकिक झाला होता; खेळामध्ये दबदबा वाढला होता. त्याचवेळी त्यांच्या शैक्षणिक यशाचा आलेखही चढताच होता.

नरेंद्र हे समोरून चाल करून येणाऱ्या खेळाडूला मन, मेंदू आणि मनगटातील शक्ती एकवटून विजेच्या चपळाईने घेरत असत. नरेंद्रची चढाई किंवा पकड म्हणजे कबड्डीचे शास्त्रशुद्ध प्रात्यक्षिक नजरेस पडे. ते स्वतः म्हणायचे की, मी खेळताना शारीरिक कौशल्य आणि शक्ती याबरोबरच डोके चालवून खेळत होतो. विविध मंडळातील, प्रतिस्पर्धी संघातील स्पर्धक खेळाडूंचा, त्यांच्या कौशल्यांचा, लकबींचा ते अभ्यास करत; त्यानुसार आपल्या खेळाची व्यूहरचना करीत. खेळाडू आणि विद्यार्थी या दोन्ही भूमिका नरेंद्र उत्तमरीत्या पार पाडत असल्यामुळे घरच्या अथवा महाविद्यालयातील मंडळींना त्यांची काळजी वाटत नव्हती. किंबहुना या सर्वांना त्यांचा अभिमानच वाटत होता.

कबड्डी स्पर्धेत प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूंनी घेरण्यासाठी केलेले कडे 'हनुमान उडी' मारून ते भेदण्यात नरेंद्रचा हात अख्ख्या महाराष्ट्रात कोणी धरू शकत नव्हतं. हनुमान उडीचे तंत्र आणि नरेंद्र हे समीकरण कबड्डीच्या मैदानात रूढ झाले होते. नरेंद्र मैदानात खेळतोय म्हटल्यावर त्यावेळचे खेळाडू आणि प्रेक्षक त्यांचा सामना पाहण्यासाठी गर्दी करत. अत्यंत प्रेक्षणीय, उत्कंठावर्धक आणि शास्त्रशुद्ध खेळ करण्यात नरेंद्र पटाईत होते. ज्या मंडळाकडून संघ घेऊन नरेंद्र स्पर्धेत उतरत त्या स्पर्धेचे सर्वोच्च बक्षीस त्याच मंडळास, संघास मिळणार असं समीकरण झालं होतं. नरेंद्र दाभोलकर, विजू जाधव, अशोक भोसले, नंदकुमार नाडगोंडा, कुमार कुलकर्णी, संपत तारळेकर, वसंतराव पावसकर यांचा सहभाग असणारा श्री. शिवाजी उदय मंडळाचा संघ म्हणजे सामन्याचे विजेतेपद निश्चित झाले आहे, असे त्याकाळी म्हटले जाई; इतका दरारा या मंडळाचा होता.

कबड्डी खेळासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी दिलेले योगदान खूप महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय स्पर्धा जिंकणाऱ्या महाराष्ट्र संघाचे ते खेळाडू होते. बांगलादेशाबरोबर कसोटी सामने खेळण्यासाठी निवडलेल्या भारतीय संघात त्यांचा सहभाग होता. त्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्येसुद्धा त्यांची लक्षणीय कामगिरी होती. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ संघाच्या कर्णधार पदाची जबाबदारी त्यांनी सलग तीन वर्षे पार पाडली होती. महाराष्ट्र राज्य चाचणी स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवणाऱ्या संघातील ते एक प्रमुख खेळाडू होते. महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धेतील कबड्डीचे अजिंक्यपद सलग तीन वर्षे मिळणाऱ्या संघाचे ते तीनही वर्षे कर्णधार राहिले होते. भारतातील अनेक राज्य व राष्ट्रीय पातळीवरील नामवंत स्पर्धा जिंकणाऱ्या श्री शिवाजी उदय मंडळाच्या संघाचे कर्णधारपद त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळले होते. खेळलेल्या सर्व सामन्यात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली होती. कबड्डीच्या वैयक्तिक

कौशल्यासाठी त्यांना आठ सुवर्ण पदके मिळालेली होती. कबड्डीतील त्यांच्या यशाचा आलेख हा नेहमी चढता राहिला. उत्कृष्ट खेळाडू आणि संघटक म्हणून त्यांचा नावलौकिक वाढतच राहिला. कबड्डी खेळातून अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा युवा छत्रपती क्रीडा पुरस्कार देण्यात आला होता. उत्कृष्ट क्रीडा संघटक म्हणून राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार देऊन त्यांना गौरविले होते.

महाराष्ट्र शासनाच्या स्पोर्ट्‌स कौन्सिलवर देशी खेळांतील तज्ज्ञ म्हणून त्यांनी पाच वर्षे जबाबदारी सांभाळली होती. छत्रपती शिवाजी पारितोषिकांच्या शासनाच्या निवड समितीचे सदस्य व नंतर अध्यक्ष म्हणून कामगिरी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. क्रीडा स्तंभलेखक व क्रीडा पत्रकार म्हणून त्यांनी अनेक मान्यवर दैनिके, साप्ताहिके, मासिके यातून कबड्डी विषयावर नियमित व सातत्यपूर्ण लेखन केलेले होते. ते डॉक्टर असल्याने कबड्डी खेळातील खेळाडूंवर उपचार व खेळाडूंच्या दुखापतींचा त्यांनी शास्त्रीय अभ्यास केलेला होता. अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा आयोजित करणाऱ्या श्री शिवाजी उदय मंडळाच्या सामना समितीचे कार्यवाह म्हणून त्यांनी काही काळ समर्थपणे जबाबदारी पार पाडली होती.

खेळाडू, संघटक, मार्गदर्शक, व्यासंगी व अभ्यासू क्रीडा प्रेमी, क्रीडास्तंभ लेखक, सामन्यांचा समालोचक अशा विविध अंगाने जवळपास २० वर्षे डॉ. दाभोलकर मैदानात मनमुराद रमले होते. एवढेच नाही, तर कबड्डी विषयावरील मराठीतील पहिलं पुस्तक त्यांनीच लिहिलेलं आहे. त्यांच्या ‘कबड्डी’ या पुस्तकात कबड्डीचा इतिहास, स्वरूप, कबड्डीचे नियम, खेळाची कौशल्ये, चढाई, बचाव, संघनायक, मैदान, खेळाचे मानसशास्त्र, खेळातील दुखापती, सामने आणि सामन्यांची तयारी, तंत्रशुद्ध कबड्डी खेळ, कबड्डीचे महत्त्व या विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी या पुस्तकात केली आहे. हे पुस्तक महाराष्ट्र शासनाच्या ‘महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा’ने सन १९८० मध्ये प्रकाशित केले आहे. हे पुस्तक त्यांनी श्री शिवाजी उदय मंडळ, सातारा व गुरुवर्य बबनराव उथळे यांना सादर अर्पण केले आहे. कबड्डीबरोबरच डॉ. दाभोलकरांना कुस्ती खेळसुद्धा आवडे. ठिकठिकाणच्या कुस्ती स्पर्धा पाहाण्यास जात असत. आपल्या तरुण सवंगड्यांना घेऊन ते गडकोट मोहिमाही करीत असत.

डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी स्वतःला सामाजिक कार्यात झोकून दिल्यावरही मंडळाशी असणारा संपर्क व संवाद कमी होऊ दिला नाही. वेळ मिळेल तेव्हा ते मंडळात येत. खेळाडूंना प्रोत्साहन देत व मार्गदर्शन करीत असत. समवयस्क व इतर खेळाडू यांना आपल्या सामाजिक कार्याची माहिती सांगत. व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची गरज, महत्त्व ते तरुणांना सांगत असत. आपला अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा हा कोणा एका व्यक्तीच्या विरोधात नसून समाजातील अपप्रवृत्तींविरुद्ध आणि लोकांच्या होणाऱ्या शोषणाच्या विरोधात आहे, विवेकी समाज निर्माण करण्यासाठी आहे असे तरुणांचे याविषयी प्रबोधन करीत. व्यापक समाजपरिवर्तनासाठी तरुणांना ऊर्जा देण्याचे काम ते सातत्याने करीत राहिले.

कबड्डीत जसे डॉ. दाभोलकरांनी कुशल नेतृत्व केले; तसेच अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत प्रभावी नेतृत्वाची धुरा सांभाळतांनाही खिलाडूवृत्ती हा त्यांचा स्थायिभाव राहिला. कबड्डीतील विचारपूर्वक चढाया आणि पकडी याप्रमाणेच त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील विविध लढे, आंदोलने तेवढ्याच ताकदीने, विचारपूर्वक यशस्वी केले. त्यांचे खेळातील शिस्त, वक्तशीरपणा हे गुण त्यांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांमध्येदेखील रुजले आहेत. चळवळीत सांघिक वृत्ती दिसून येते. खेळाप्रमाणेच चळवळीतही इतरांना प्रोत्साहन, प्रेरणा, संधी व अवकाश देत राहिले. डॉक्टर दाभोलकरांचा खेळातील चढता आलेख त्यांच्या नेतृत्वाखालील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतही चढता राहिला आहे. ते योग्य वेळी खेळातून निवृत्त झाले आणि मार्गदर्शकाची भूमिका त्यांनी जशी घेतली त्याचप्रमाणे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्याध्यक्ष पदही त्यांनी स्वतःहून सोडले आणि मार्गदर्शकाची भूमिका त्यांनी स्वीकारली होती. त्यासाठी त्यांनी चळवळीचे सक्षम नेतृत्व करतील असे अनेक कार्यकर्ते तयार केले होते. त्यांचे खेळातील विविध पैलू आणि गुण हे साधर्म्याने चळवळीत प्रतिबिंबित झालेले दिसतात. व्यापक समाजपरिवर्तनाची उद्दिष्टे ठेवून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला दिलेला वेग वाढतच राहील, यात शंका नाही. त्यांच्या या योगदानासाठी त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!

●

# या नेतृत्व गुणाला काय म्हणावे?



**प्रा.परेश शाह,** शिंदखेडा
९४२१४६५८६४

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या जाण्याला आता दहा वर्षे होत आहेत. तसे म्हटले तर, दहा वर्षांचा कालावधी हा बऱ्यापैकी मोठा काळ आहे. पण काळ किती झपाट्याने पुढे सरकत जातो ना! डॉक्टरांच्या निर्घृण खुनानंतर कितीतरी महिने टी.व्ही. चॅनल्सवर चालणारी चर्चा, वृत्तपत्रं, मासिकांतून त्यांच्याबद्दल, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत, कार्याबद्दल, कर्तृत्वाबद्दल, कार्यपद्धतीबद्दल, सहवासाबद्दल भरभरून लेख, अनुभव छापून येत होते.

पण हे सर्व अगदी आताच घडले आहे असे वाटत राहाते. मात्र त्याला आता उणीपुरी दहा वर्षे झाली आहेत. या काळात डॉ. दाभोलकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जवळपास सर्वच पैलूंबद्दल, नेतृत्व गुणांबद्दल कितीतरी चर्चा झाली आहे. त्याचप्रमाणे चळवळीतल्या प्रत्येकाजवळ त्यांच्या आठवणींचा काही ना काही ठेवा आहे. डॉक्टरांचे नेता म्हणून सर्वांशीच असे नाते होते की, प्रत्येकालाच आपण दाभोलकरांच्या फार निकटचे होतो असे वाटावे. तेव्हा आज मी डॉ. नरेंद्र दाभोलकरांबद्दल आणखी काय वेगळे लिहावे? असा विचार करीत होतो आणि पटकन मनात आले की, ज्या गुणाबद्दल अद्याप कोणी लिहिलेले वाचनात नाही, त्या संदर्भातील अनुभव लिहावा. खरे तर, ज्याविषयी मी लिहिणार आहे, माझ्या मते हे एक अत्युच्च दर्जाचे संघटनामूल्य आहे. असा नेतृत्वगुण अपवादानेच कोणा नेत्याकडे असतो. झाले असे की, त्या टर्मला माझ्याकडे राज्य पदाधिकारी म्हणून कोणतीही जबाबदारी नव्हती. फक्त कार्यकारी समितीचा निमंत्रित होतो. त्यामुळे क्वचितच गरजेनुसार बैठकीला उपस्थित राहावे लागत असे. पण अविनाशभाई, मी, विनायक व अधूनमधून सुरेश बोरसे आम्ही मात्र कायम संपर्कात होतो. नियमित पत्रव्यवहार होत असे. चार-आठ दिवसांत फोनवर बोलणे होई आणि किमान महिन्यातून एक पूर्ण दिवस न चुकता एकत्र बसत असू. संघटनेबाबतचीच चर्चा, विचारविनिमय, थोडे चिंतन आणि गप्पांचा बॅकलॉग पूर्ण करणे असा कार्यक्रम ठरलेला. त्यामुळे संघटनेच्या कामाची अद्ययावत माहिती असे.

त्यावेळी डॉ.नरेंद्र दाभोलकरांच्या काही निर्णयांबाबत, कार्यपद्धतीबद्दल आमची मतभिन्नता होती. काही गोष्टी खटकत होत्या. विनायकला त्यातून थोडी निराशा आली होती. एकतर काम थांबवावे किंवा स्थानिक ठिकाणीच काम करावे अशा मताशी विनायक आला होता. माझे व विनायकचे त्याबाबत बोलणे होई. शेवटी हे डॉक्टरांना कसे सांगायचे? फोनवर तर हे बोलणे उचित होणार नाही. राज्य कार्यकारिणी ३-४ महिन्यांनी होईल. म्हणून हे सर्व मुद्दे मनमोकळेपणे डॉक्टरांना पत्राद्वारे लिहून कळवावेत असे ठरविले आणि बेधडकपणे ८-१० पानांचे एक लांबलचक पत्र लिहून दाभोलकरांना पाठविले.

या पत्रात आम्हाला पडलेले काही प्रश्न होते, डॉक्टरांसोबतचे काही मतभेद होते, आक्षेपही होते आणि खटकत असलेल्या, न आवडलेल्या काही गोष्टीदेखील होत्या. पण यातील भावना मात्र टीकेची, तक्रारीची, बंडाची, नेतृत्वाला कमीपणा आणणारी अजिबात नव्हती. तर संघटना आणि नेत्याबद्दलच्या आत्यंतिक प्रेमातून, संघटनेतील प्राधान्यक्रम, संघटनांतर्गत लोकशाहीचे मजबुतीकरण आणि नेतृत्वाच्या कार्यपद्धतीशी निगडित अशी स्वच्छ-निर्मळ भावना त्यात होती. म्हणूनच थेटपणे असे पत्र आम्ही लिहू शकलो. पण नेता म्हणून डॉक्टरांचा मोठेपणा काय?

महाराष्ट्रातील एकूणच सामाजिक चळवळींमध्ये एक कुशल संघटक म्हणून सर्वमान्य असलेल्या, कोणालाही हवेहवेसे वाटणाऱ्या, राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, माध्यम अशा सर्वच क्षेत्रांत प्रचंड मान्यता असलेल्या इतक्या मोठ्या उंचीच्या नेतृत्वाने दोन सामान्य कार्यकर्त्यांच्या पत्राची दखल ती किती घ्यावी? इतरत्र तर त्याला सहज केराची टोपली दाखवली गेली

असती. कदाचित आम्हाला हळूहळू बेदखल केले गेले असते. पण डॉ.दाभोलकरांनी आम्हाला फोन करून कळविले की, तुमचे पत्र मिळाले. आपण तिघे शक्य तितक्या लवकर प्रत्यक्ष भेटून सविस्तर बोलूया. हे लिहितानादेखील माझा ऊर भरून आला आहे की, आम्ही लिहिलेले पत्र व एकूणच संघटना म्हणून त्या अनुषंगाने आम्हा दोघांशी बोलण्यासाठी एकदा नव्हे, तर दोनदा डॉक्टरांनी पूर्ण दिवसभराचा वेळ दिला.

डॉ. दाभोलकरांचा काही दिवसांतच फोन आला. चाळीसगाव, जि. जळगाव येथे मानसिक आरोग्यावरची परिषद घेतली होती. त्यासाठी डॉक्टर खान्देशात येणार होते. ठरवून डॉक्टर एक दिवस आधी आले. नेहमीप्रमाणे रेल्वेने पहाटे चाळीसगाव येथे पोहोचून सामंत काकांकडे थांबले होते. आम्हीही तेथे पोहोचलो. त्यानंतर चाळीसगाव नजीकच्या पाटणादेवी येथील वनविभागाच्या एका डॉर्मेटरीमध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत डॉक्टर, मी आणि विनायक आमच्या पत्राच्या अनुषंगाने बोलत होतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे डॉक्टरांनी अतिशय शांतपणे आमचे संपूर्ण म्हणणे ऐकून घेतले. मला चांगले आठवते, सुरुवातीला तर जवळपास एकटा विनायक बोलत होता व डॉक्टर ऐकत होते. त्यानंतर पत्रातील एक-एक मुद्द्यांवर बोललो. या बैठकीत आमच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे मिळाली असे नाही, सर्वच मुद्द्यांबाबत समाधान झाले असेही नाही. त्यातील काहींबाबत दाभोलकरांचा दृष्टिकोन समजला, त्याच्याशी आम्ही सहमत असूच असेही नाही.

पण नेतृत्व म्हणून सर्वात मोलाची गोष्ट काय? तर डॉ. नरेंद्र दाभोलकरांसारखा एवढा मोठा नेता आपल्या सहकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी संपूर्ण एक दिवस देतो. मतभिन्नता समजून घेतो. आक्षेपदेखील शांतपणे ऐकून घेतो ही केवढी मोठी गोष्ट! काही बाबतीत डॉक्टरांनी प्रामाणिकपणे हे मान्य केले की, आता या वयात अंगवळणी पडलेली ही सवय बदलणे शक्य नाही, तुम्ही समजून घ्या. या औदार्याचे, खुलेपणाचे, मनाच्या मोठेपणाचे मोल शब्दात सांगण्यापलीकडचे आहे. यानंतर काही महिन्यांनी पुन्हा अशीच संधी डॉक्टरांनी स्वतःच दिली. मे महिन्यात संघटनेतील काही निवडक प्रमुख कार्यकर्त्यांचे शिबिर बोराडी (जि.धुळे) येथे महाराष्ट्र अंनिसचे राज्य उपाध्यक्ष दिवंगत व्यंकटराव आण्णा रणधीर यांच्या पुढाकाराने घेतले होते. आदल्या दिवशी शिंदखेडा येथे एक आंतरजातीय विवाहाला डॉक्टर आणि आण्णा उपस्थित होते. त्यानंतर डॉक्टर आण्णांच्यासोबत बोराडीला मुक्कामाला गेले नाहीत. आमचे असे ठरले की, मी, विनायक आणि डॉक्टर शिरपूर येथे आपले कार्यकर्ते प्रा. भरत सोनार यांच्या बंगल्यावर चर्चेसाठी रात्री मुक्कामी थांबावे व सकाळी उठून पुढे बोराडीला जावे. त्या ठिकाणीदेखील फक्त डॉ. दाभोलकर, मी व विनायक स्वतंत्र खोलीत रात्री तीन वाजेपर्यंत वेगवेगळ्या मतभेदांच्या मुद्द्यांवर चर्चा करीत होतो. सामान्य कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, समजून घेणे, आक्षेप-मतभेद असले तरी खुलेपणाने आणि मुक्त वातावरणात मांडायला संधी देणे, योग्य सूचनांचा आदर आणि स्वीकार करणे, त्यानुसार स्वतःमध्ये शक्य असतील ते बदल करणे हे खरोखरच अत्युच्च दर्जाचे संघटनात्मक मूल्य आहे. नेतृत्वाचा महत्त्वाचा गुण आहे. या नेतृत्व गुणाला काय म्हणू? असाधारण (Uncommon), दुर्मिळ (Rare), अपवादात्मक (Exceptional) की, एकमेवाद्वितीय (Unique)? प्रेरणादायी स्मरण! विनम्र अभिवादन!!!

(आम्ही लिहिलेल्या या पत्राबाबत, त्यातील मुद्द्यांबाबत डॉक्टर हयात असेपर्यंत आम्ही कधीही, कोठेही त्याची वाच्यता केली नाही. डॉ. दाभोलकर, मी व विनायक या तिघांपलीकडे त्याचे तपशील कोणालाही माहीत नाहीत. डॉक्टरांच्या जाण्यानंतर असे पत्र आम्ही लिहिले होते हे काही वेळा बोललो असू. पण त्यातील मजकुराबाबत मात्र कधीच नाही.)

●

## वाचक प्रतिक्रिया

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हा किशोर बेडकिहाळ यांचा जुलै अंकातील लेख वाचायला मिळाला. लेख खूप छान लिहिलेला आहे. लेख वाचत असताना संपूर्ण युद्धाचं वातावरण डोळ्यासमोर उभ राहिल होतं. सुरुवातीच्या ओळी पासूनच वाचायला मन लागले.

**- कल्पेश गायकवाड**



# आठवणीतील शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर

**मच्छिंद्रनाथ मुंडे,** पनवेल
९८७०७३०३६८

डॉ. दाभोलकर यांची आणि माझी प्रथम भेट सन १९८७ मध्ये माझ्या 'विज्ञानाच्या दुर्बिणीतून अंधश्रद्धा' या पुस्तकाच्या रूपाने झाली. जे १९८५ मध्येच प्रकाशित झालेले होते. सदर पुस्तक पुण्यामध्ये कुठेतरी डॉक्टरांच्या वाचण्यात आले आणि त्यांच्या चाणाक्ष दृष्टीने हे हेरले की; मुंडे हे अंधश्रद्धा निर्मूलन कामासाठी रेडिमेड कार्यकर्ता म्हणून उपयुक्त ठरू शकतात, याचा शोध घेणे गरजेचे आहे. त्यानंतर त्यांनी माझा शोध पुस्तकावरील माझ्या पत्त्यानुसार डोंबिवली येथे रहात असलेल्या राजीव देशपांडे व दिवंगत बिपीन रणदिवे यांच्या सहकार्याने घेतला; कारण मीही त्यावेळी डोंबिवली येथे राहात होतो. त्यावेळी डॉक्टर अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये काम करत होते. त्यामुळेच त्यावेळी मीही त्यांचे सोबत जोडला गेलो. पुढे वर्ष-दीड वर्षे झाल्यानंतर अभाअंनिसमध्ये काही मुद्द्यांवर वादविवाद वाढत गेले व फुटीची चिन्हं दिसू लागली. असेच एके दिवशी सदर विषयाबाबत चर्चा करण्यासाठी, अभाअंनिसच्या निवडक कार्यकर्त्यांची एक बैठक पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीकरिता मी व राजीव देशपांडे डोंबिवलीहून सकाळीच पुण्याला बैठकस्थळी पोहोचलो होतो. त्याचवेळी तेथे डॉक्टर दाभोलकर, इतर स्थानिक कार्यकर्त्यांसह उपस्थित होते. त्यानंतर डॉक्टरांनी मला व राजू देशपांडे यांना खांद्यावर हात ठेवून चला चहा घेऊन येऊ असे म्हणून बाहेर घेऊन गेले. जवळच्याच एका छोट्याशा हॉटेलमध्ये आम्ही चहा घेण्यासाठी बसल्यानंतर डॉक्टरांनी आम्हाला प्रश्न केला की, आज काही वाद-विवाद वाढलाच तर आपण काय करायचे? त्यावर प्रत्युत्तर म्हणून मी लगेच म्हटलं की, आपण सभात्याग करायचा. आम्हाला हे मान्य नाही असे म्हणून बाहेर पडायचं. त्यावर डॉक्टरांनी असं म्हटलं की, असं आपण करणं योग्य होणार नाही. आपण तेथेच चर्चा घडवून आणू व त्याच चर्चेमध्ये एक ठराव आपण मांडूया आणि त्या ठरावामध्ये आपण असं नमूद करूया की; आपण वादविवाद करण्यापेक्षा विवेकी विचारांची माणसं आहोत, म्हणून आपण सर्वांनुमते वेगळं होणे हाच त्याच्यावरचा एक उपाय आहे व वेगळं होऊन काम चालू ठेवणे हे गरजेचे आहे. कारण लोकांना आपल्या कामाची गरज आहे. त्यामुळे आपण स्वतंत्रपणे काम करायला हवं, म्हणून या ठरावद्वारे मी सर्वांना अशी विनंती करतो की, ज्यांना कोणाला डॉक्टर दाभोलकरांच्याबरोबर भविष्यात काम करण्याची इच्छा आहे त्यांनी हा ठराव वाचून झाल्यानंतर डॉक्टर दाभोलकर उठून बाजूच्या (याच शाळेच्या) रूममध्ये जातील तेव्हा त्यांनी डॉक्टर दाभोलकरांबरोबर उठून बाजूच्याच खोलीत जावे व उर्वरित लोकांनी येथेच बसून श्याम मानव यांच्याबरोबर कार्यरत रहावे आणि हो, यानंतर देखील आपण विभक्त झालो याची कुठेही वाच्यता माध्यमांसमोर करायची नाही. असं वर्ष-दोन वर्ष आपण अंधश्रद्धा निर्मूलन समिती याच नावाने काम करायचे आहे. त्यानंतर ज्यांचे काम वाढेल त्यांनी स्वतंत्रपणे काम करावे व उर्वरित लोकांनी अखिल भारतीय अंनिस म्हणून काम करावे, असे सर्वानुमते ठरवण्यात येत आहे आणि असा ठराव मांडण्याची जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली. तेथेच बसून डॉक्टर व आम्ही चार ओळीचा ठराव लिहून काढला व दुपारी सभेमध्ये मी तो मांडला. अशा रीतीने त्यावेळी आपण वेगळं झाल्यानंतर वर्षे-दीड वर्षे काम करत राहिल्यानंतर १९८९ मध्ये आपण 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' या नावाने संघटनेचे रजिस्ट्रेशन केले. पुढे काही कालानंतर डॉक्टरांनी समितीचा आर्थिक व्यवहार सांभाळण्यासाठी 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र' नावाचा ट्रस्ट स्थापन करून त्याचे रजिस्ट्रेशन केलं.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची दुसरी आठवण म्हणजे सुरुवातीच्या काळात मी व डॉक्टर समितीच्या संघटना बांधणीसाठी सोबतच महाराष्ट्रभर फिरत असू. अनेकदा ते वैज्ञानिक दृष्टिकोन व अंधश्रद्धा निर्मूलनाची


गरज काय? या विषयावर बोलत व मी बुवाबाजी, त्या अनुषंगाने केले जाणारे चमत्काराचे प्रयोग सादर करीत असे. असेच एकदा धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथील दिवंगत डॉ. रवींद्र टोणगांवकर सर यांनी एक जाहीर कार्यक्रम दोंडाईचा येथे आयोजित केलेला होता. या कार्यक्रमाला आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी बरीच गर्दी केलेली होती. कार्यक्रम सायंकाळी पाच-साडेपाच वाजता होता. सभामंडपात मंचावर चार खुर्च्या ठेवण्यात आल्या होत्या आणि कार्यकर्ते डॉक्टरांची व माझी वाट पाहत थांबले होते. कार्यकर्त्यांचा धीर खचत चालला होता. कारण आम्ही दोघेही वेळेवर पोहोचलेलो नव्हतो, त्याच क्षणी मी बसमधून दोंडाईचा स्टॉपवर उतरून तेथून चालतच सभास्थळी पोहोचलो. मला पाहून कार्यकर्त्यांना थोडा धीर आला. चहापाणी घेऊन लगेच डॉ. टोणगांवकर सरांनी, मला कार्यक्रम सुरू करायचा का? अशी विचारणा केली. मी म्हटले हो, हरकत नाही. डॉ.दाभोलकर येतील तेव्हा ते त्यांचे व्याख्यान पुढे सुरू करतील. असे ठरवून मी माझी चमत्काराची बॅग घेऊन मंचावर गेलो. माझी ओळख डॉ. रवींद्र टोणगांवकर सरांनी श्रोत्यांना थोडक्यात करून दिली आणि चार-सहा प्रयोग संपताच, एक वयोवृद्ध संतोषी माता भक्त उभे राहून त्यांनी मला थेट प्रश्न केला की; आपण जे सांगता आहात ते सर्व काही खरंच आहे. परंतु आमच्या गावात व संपूर्ण परिसरात बऱ्याच महिला संतोषी मातेचा उपवास दर शुक्रवारी करतात (त्याकाळी संतोषी माता जरा जास्तच जोरात होती) आणि त्या व्रताची सांगता सात दिवसानंतर म्हणजे पुढच्या शुक्रवारी उद्यापनाने करतात. त्यावेळी एक चमत्कार संतोषी मातेच्या कृपेने घडतो असे लोक म्हणतात आणि मी ते प्रत्यक्षात पाहिलेले आहे. तेथे व्रतानिमित्त एका लाकडी पेटीत ठेवलेल्या एका चपातीच्या दोन चपात्या सात दिवसानंतर होतात आणि ही संतोषी मातेची कृपा आहे, अशी वदंता सर्वत्र आहे. आपण याबाबत काय म्हणणार? काय स्पष्टीकरण देणार? मी काही म्हणायच्या अगोदर मंचावरील संयोजकांनी त्या आजोबांना शांत करीत खाली बसण्यास सांगितले व आपल्या प्रश्नांची उत्तरे कार्यक्रमाच्या शेवटी दिली जातील, असे जाहीर केले. मी पुन्हा चमत्कार सुरू करायला लागताच, जनसमुदायातून पुन्हा आवाज आला की, प्रश्नाचे उत्तर प्रथम द्या! असा गोंधळ सुरू असतानाच डॉ. दाभोलकर जे पंधरा-वीस मिनिटं पूर्वीच मंडपात आलेले होते व शांतपणे एका कोपऱ्यात खुर्चीवर बसलेले होते, ते कुणाच्याही लक्षात आलेले नव्हते, ते तडक उठून मंचावर आले व लोकांना शांत करत त्यांनी माईक हातात घेतला व माझ्या कानात विचारले की, ''मुंडे, तुम्हाला याचे काही उत्तर माहीत आहे का?'' मी म्हटलं, ''हो!'' मग मी डॉक्टरांना प्रत्युत्तर म्हणून लगेच विचारले की, ''आपणास काही असा प्रकार माहीत आहे का?'' त्यांनी म्हटलं, ''नाही, मी हे प्रथमच ऐकतो आहे.'' मग मी म्हटलं की, ''हा प्रकार एकंदरीत बुरशीच्या पराक्रमाचा असावा असं मला वाटतं.'' ते शांत झाले. मी म्हटलं, ''आपण घडणारा प्रकार शांतपणे त्यांच्या तोंडून पुन्हा एकदा ऐकू व नंतर मी त्यावर उत्तर देईन.'' ते हो म्हणाले व नंतर त्यांनी त्या आजोबांना पूर्ण घटना कशी घडते? त्याबद्दल माईकवरून विषद करण्यासाठी बोलाविले. आजोबांनी असे म्हटले की, ''आमच्या येथील काही महिला, संतोषी मातेचे व्रत एका शुक्रवारी करतात व त्याची सुरुवात सकाळी होते. त्यावेळी सर्व महिला एका लाकडी पेटीत एक चपाती ठेवतात व त्या चपातीवर वरून कोरा (without milk) गोड चहा ओततात. त्यानंतर लगेच त्या लाकडी पेटीला कुलूप लावून बंद केले जाते व तिची पूजा केली जाते आणि मग व्रत समाप्ती दिवस म्हणजे पुढच्या शुक्रवारी उद्यापन करून ती पेटी सर्वांसमक्ष उघडली जाते तेव्हा आश्चर्य असे घडते की, पेटीत एका चपातीचे दोन चपातीमध्ये रूपांतर झालेले असते. वर भरपूर पांढरेशुभ्र पिठासारखे थरदेखील चपातीवर जमा झालेले असतात. मग हे संतोषी मातेच्या कृपेने घडते का? लोक तरी तसेच मानतात. यावर आपले उत्तर काय?'' हे ऐकून मी शांतपणे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले. ''ज्याअर्थी पेटी कुलूपबंद आहे, म्हणजे त्यात अंधार आहे. आतमध्ये कोंडलेली दमट हवा आहे. सोबत गव्हाची चपाती हे अन्न आहे आणि त्यावर कोरा चहा म्हणजे ग्लुकोज आहे. एवढं सर्व असेल, तर मग बुरशीची वाढ झपाट्याने होण्यात कोणतीच अडचण नाही. इथेही तसेच घडते. एकतर चपाती किंवा भाकरीला दोन थर असतात म्हणजेच वर एक थर (पापुद्रा) व खाली दुसरा थर. या दोन थरांच्यामध्ये हवा कोंडलेली असते. तेथे बुरशीची वाढ

झपाट्याने होते. नंतर तीच बुरशी चपातीच्या बाजूचे काठ फस्त करून खालचा व वरचा पापुद्रा विलग होतात व बुरशी बाहेरच्या बाजूला वाढू लागते व वर आणि खाली मोठ्या प्रमाणात पांढरीशुभ्र बुरशी पिठाच्या रंगाची तयार झालेली दिसते आणि अशी वाढ होण्यासाठी सात दिवस हा फार मोठा कालावधी बुरशीच्या वाढीस मिळतो, त्यामुळे एका चपातीच्या पापुद्र्याच्या रूपाने दोन चपातीमध्ये रूपांतर झाल्याचे लक्षात येते. हा चमत्कार संतोषी मातेचा नाही, तर तो योग्य वातावरणात वाढणाऱ्या बुरशीचा आहे. प्रत्यक्ष आपण कोणीही असा प्रयोग घरीदेखील करून पाहू शकता. त्यासाठी कुठल्याही व्रताची किंवा उपवास करण्याची गरज नाही.'' असं मी म्हणताच, जनसमुदायातून प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला व माझे काम फत्ते झाले. मला असे सांगायचे आहे की, वरील दोन्ही आठवणीत डॉक्टरांचा कार्यकर्त्यांप्रति विश्वास, त्याला समजून घेणे व संधी देणे तसेच मनाचा मोठेपणा, असे गुण दिसून येतात. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंनिस झपाट्याने भविष्यात पुढे वाढत गेली आणि आज आपणास तिचं एका वटवृक्षात रूपांतर झालेलं पाहावयास मिळते. डॉ. दाभोलकरांच्या आठवणी खूप सांगता येतील; परंतु विस्तार भयास्तव जास्त काही न सांगता त्यांची अजून एक आठवण सांगून याची समाप्ती करतो.

असेच एकदा डॉक्टर दाभोलकर यांचा कार्यक्रम ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे होता. त्यासाठी ते पहाटेच महाराष्ट्र एक्सप्रेसने साताऱ्याहून रेल्वेने कल्याण व तिथून लोकल पकडून डोंबिवली येथे माझ्या घरी आलेले होते. मी त्यांची वाटच पाहातच होतो. कारण ते कार्यक्रमासाठी, सकाळीच माझ्याकडे येणार हे पूर्वनियोजित होते. शहापूर येथे मीच त्यांना घेऊन जाणार होतो. परंतु सकाळी सकाळी त्यांची रिकाम्या हाताने झालेली घरातील एन्ट्री पाहून, मला थोडे आश्चर्य वाटले. सहज उत्सुकतेपोटी मी त्यांना विचारले की, आपण असेच रिकामे कसे आलात? आपली बॅग कुठे आहे? तर ते शांतपणे प्रथम खुर्चीवर बसले. माझ्याकडे पाणी मागितले व सुशीलाला चहा करण्यासाठी मी सांगितले. त्यानंतर त्यांनी शांतपणे मला सांगितले की, मी रात्री साताऱ्याहून महाराष्ट्र एक्सप्रेस गाडीने प्रवास सुरू केला. त्यानंतर मध्यरात्री मला कधीतरी झोप लागली. रात्री माझ्या जवळची माझी बॅग कोणीतरी चोरट्याने लांबवली. त्यामुळे माझे सर्व कपडे, काही थोडेफार पैसे व इतर काही कागदपत्रेदेखील चोरीला गेली. मी या ठिकाणी अंगावरील वस्त्रानिशी आलेलो आहे. त्या काळामध्ये मोबाईल नावाचा प्रकार नव्हता. त्यांना चहा देऊ केला, तो त्यांनी शांतपणे घेतला व चेहऱ्यावर कोणतेही दुःख न दर्शवता सकाळचा व्यायाम सुरू केला. थोडा वेळ ते टेरेसवरती चालले. काही योगाचे प्रकार केले आणि त्यानंतर आंघोळ करून त्याच कपड्यानिशी त्यांनी शहापूर येथे जाण्यासाठी तयारी केली. त्यांना माझे कपडे मी देत असतानादेखील त्यांनी ते स्वीकारले नाहीत. आम्ही नाश्ता घेऊन त्यानंतर दोघे शहापूर येथे पोहचलो. दिवसभर कार्यकर्त्यांसमोर कार्यक्रम सादर केला व सायंकाळी पुन्हा ते तसेच कल्याणहून गाडीने सातारा येथे परतले. या सर्व कृतीवरून असं लक्षात आले की, संकट समयी आपण अजिबात खचून न जाता जशी आहे तशी ती परिस्थिती स्वीकारणं व इतरांना दोष न देता संकटातून बाहेर पडणं, हे महत्त्वाचं असतं आणि त्याचा प्रत्यय त्यादिवशी मला डॉक्टरांच्या कृतीतून आला. यातच त्यांचा मोठेपणा सिद्ध होतो. असे होते डॉ. दाभोलकर!

•

**विनम्र अभिवादन**



विख्यात खगोल शास्त्रज्ञ
डॉ. जयंत नारळीकर यांची पत्नी आणि गणितज्ज्ञ
**डॉ. मंगला नारळीकर**
यांना
**विनम्र अभिवादन**



# ...आणि आईच्या डोळ्यातून अश्रू आले!



**प्रकाश कांबळे,** वर्धा
९४२३११८७३०

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे सन २००४ ला घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत माझ्या निबंधाला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आणि माझ्या अंनिसच्या प्रवासाचे तिकीट बुक झाले. पुढे २००५ ला नागपूर येथील विनोबा विचार केंद्रामध्ये शिबिरात मी सहभागी झालो आणि पहिल्यांदा ज्यांचे नाव, कार्य ऐकून होतो, त्या कुशल संघटकाशी म्हणजेच डॉ. नरेंद्र दाभोलकरांशी परिचय झाला. त्याच शिबिरात विनायक सावळे (शहादा) यांचा बाहुल्यांच्या खेळातून अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रयोग बघितला आणि प्रसिद्ध विचारवंत, साहित्यिक प्रा. डॉ. यशवंत मनोहर यांचे अध्यक्षतेखाली डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे व्याख्यान ऐकले. त्यांचे व्याख्यान ऐकून मी प्रचंड प्रभावित झालो आणि ज्या चळवळीचा नेता वैचारिकदृष्ट्या इतका परिपक्व, प्रगल्भ आणि कृतिशील आहे त्या महा.अंनिसचा आपणही एक घटक व्हावे, हा विचार मनात पक्का करून मी माझ्या प्रवासाला वेळ, श्रम आणि पैसा यांची जशी जमेल तशी गुंतवणूक करून सुरुवात केली.

वर्धा शहर, जिल्हा आणि महा.अंनिस हा संबंध सक्रिय कार्यकर्ता गजेंद्र सुरकार यांच्याशिवाय पूर्णत्वास होऊ शकत नाही हे ओळखून मी गजेंद्र सुरकार यांचे मार्गदर्शनात वर्धा शाखेतील प्रत्येक उपक्रमात, कार्यक्रमात, शिबीर, प्रशिक्षण, व्याख्यानात सक्रिय होवू लागलो. महा.अंनिसचे विदर्भातील जाळे आणखी विस्तारावे यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर दर पाच-सहा महिन्यांनी वर्धा दौऱ्यावर येऊन बैठका, शिबीर, प्रशिक्षण, व्याख्याने घ्यायचे. त्यांची संवादाची भाषा अत्यंत मृदू, संयमी आणि थेट काळजाला भिडणारी असायची. वर्धा दौऱ्यात डॉ. नरेंद्र दाभोलकर आले आणि मी उपस्थित राहिलो नाही असे कधी झाल्याचे मला आठवत नाही. त्यामुळे मलाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख खूप जवळून होऊ लागली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी मला जाणवलेले पैलू असे.

- त्यांची राहाणी अत्यंत साधी (कॉटनचे शर्ट, पँट) पण आकर्षक होती.
- वाचन, लेखन, चिंतन इ. सामर्थ्यावर ते कोणताही विषय सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत, मुद्देसूद, पुराव्यानिशी मांडत असे.
- त्यांच्या कथनी आणि करणीमध्ये कधीच अंतर मला जाणवले नाही.
- वेळेचे नियोजन करून त्याचे तंतोतंत पालन करण्याचा त्यांचा प्रयत्न असे.
- कार्यकर्त्यांच्या चुका झाल्या तरी ते आमच्यावर चिडले किंवा रागावल्याचे मला आठवत नाही.
- मी एमबीबीएस आहे; एका मोठ्या चळवळीचा संस्थापक, कार्याध्यक्ष आहे, याचा अजिबात गर्व नव्हता. सर्वसामान्य कार्यकर्त्यांसारखे ते वावरत असत.
- दुसऱ्याने तुमच्यासोबत कसे वागावे? अशी अपेक्षा तुम्ही जशी करता तसे वर्तन, तशी कृती इतरांसोबत तुमची असावी असे ते आम्हाला सांगत असे.
- वर्धा दौऱ्यात ते कार्यकर्त्यांच्या घरी भेटी देऊन कुटुंबीयांशी संवाद साधत असत.

अशा या सद्गुणी व्यक्तिमत्त्वाशी माझा आणखी संबंध आला तो महा. अंनिसतर्फे दिनांक ४ ते ६ नोव्हें २०११ ला सरोज सभागृहात आयोजित केलेल्या शिबिराच्यावेळी. त्यावेळी अविनाश पाटील (राज्य कार्याध्यक्ष), मिलिंद देशमुख, शहाजी भोसले आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर शिबिर घेण्यासाठी आले होते. दिवसभराचे विषय घेऊन सायं ७ वा. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे त्याच ठिकाणी जाहीर व्याख्यान असायचे. व्याख्यानानंतर आम्ही जेवण घेतले आणि मी डॉक्टरांकडे गेलो. त्यांना माझे घरी आराम करण्यासाठी चला अशी विनंती केली. घर किती दूर आहे? घरी कोण आहे? इ. प्रश्नांची उत्तरं माझ्याकडून जाणून घेतली आणि मला

होकार दिला. नुकतीच दिवाळी संपली होती. थंडी पडायला सुरुवात झाली होती. माझी सहचारिणी दिवाळी सुट्टी असल्याने माहेरी गेली होती. मी आणि माझी आई दोघेच घरी होतो. घर भाड्याचे होते पण स्वतंत्र होते. पाच रूम होत्या. त्यामुळे कितीही लोकं आली तर अडचण होईल हा प्रश्नच नव्हता. आम्ही रात्री १० ते १०.३० च्या दरम्यान पायीच घरी आलो. सोबत अविनाश पाटील, मिलिंद देशमुख, शहाजी भोसले आणि डॉक्टर होते. आम्ही घरात प्रवेश करताच सरांना माझी आई दिसली, कोण रे! आई का? मी हो म्हटले, कशा आहात आई? जेवण झालं का? इतका वेळ तुम्ही जाग्या होत्या का? अशी आस्थेने, प्रेमाने, आत्यंतिक जिव्हाळ्याने डॉक्टरांनी आईशी संवाद साधला. परत एकदा सर्व पदाधिकाऱ्यांशी आज झालेल्या विषयाबद्दल, उद्याच्या नियोजनाबद्दल चर्चा सुरू झाली. रात्री १२.३० पर्यंत चर्चा सुरू होती, त्यानंतर आम्ही झोपी गेलो.

सकाळी ६.३० ला मी उठलो, तर डॉक्टर मला व्यायाम करताना दिसले. बहुदा त्यांच्याकडे बघितल्यावर त्यांनी आंघोळ केली असावी असे मला जाणवले. मी नमस्कार करीत, ''सर किती वाजता उठलात तुम्ही? तुमची अंघोळसुद्धा झाली.'' ते म्हणाले, ''अरे! मी दररोज पाच वाजता उठतो, आंघोळ करून योगा, व्यायाम, चिंतन, ध्यान करतो.'' ''पण सर, तुम्ही मला आवाज दिला असता तर, मी अंघोळीसाठी गरम पाणी दिले असते.'' यावर ते म्हणाले, ''मी नेहमीच थंड पाण्याने अंघोळ करतो.'' मी मात्र आश्चर्य व्यक्त करीत होतो की, काय ही मनाला लावून दिलेली शिस्त? आम्ही मात्र गरम पाण्याने अंघोळी केल्या आणि सरोज सभागृहात जाण्याची तयारी करू लागलो, तोपर्यंत डॉक्टर पुस्तक वाचत बसले होते. साधारण नऊ वाजता घर सोडण्यापूर्वी माझ्या आईशी त्यांनी संवाद साधला होता, माझ्या आईला पण त्यांचे व्यक्तिमत्त्व भावले होते. दोन दिवसांच्या माझ्या घरच्या मुक्कामानंतर दि.६ नोव्हेंबर २०११ मी त्यांना म्हटले, ''सर! आता माझ्याकडे केव्हा मुक्कामी येणार?'' यावर ते म्हणाले, ''तुझं स्वतःचं घर झाल्यावर नक्की येईन!'' आईचा निरोप घेवून आम्ही सरोज सभागृहात आलो.

अंधश्रद्धेच्या विळख्यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी, विज्ञान आणि विवेकाचा उजेड मनात रुजविण्यासाठी, संतांचा, समाजसुधारकांचा, फुले-शाहू-आंबेडकरांचा वारसा उराशी घेऊन संविधाननिष्ठ कृती करणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची पुणे येथे २० ऑगस्ट २०१३ रोजी गोळ्या घालून हत्या झाल्याची बातमी कानावर आली. हातपाय गळून पडल्यागत झाले होते, डोकं सुन्न झालं होतं. मनामध्ये प्रचंड वेदना, दुःख, संताप, चीड निर्माण झाली. क्षणभर असं वाटत होतं की, ही बातमी खोटी ठरावी! पण, विचाराचा प्रतिवाद विचाराने न करणाऱ्या प्रवृत्तीने, माणूस डोळस होऊच नये अशा विषमतावादी व्यवस्थेने डॉक्टरांची हत्या केली होती. माझे डोळे पाणावले होते, काहीही सुचत नव्हते. आई तिच्या रूममध्ये होती, मी तिला ही बातमी सांगितली. तिच्या डोळ्यांतून अश्रू आले आणि म्हणाली, ''भलकस वाईट झालं! मोठा चांगला माणूस होता, मायी रोज विचारपूस करायचा, कावून मारलं गा, त्यांना?'' पण त्यावेळी मी उत्तर देण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. जन्म आणि मृत्यू याच्या दरम्यानच्या प्रवासाला आपण जीवन म्हणतो. जीवन जगत असताना किती वर्षे जगलात? हे महत्त्वाचे नसून, कसे जगलात? हे फार महत्त्वाचे आहे. डॉक्टरांची अशी हत्या होणे हे पुरोगामी चळवळीतील सामान्य कार्यकर्ता ते पदाधिकाऱ्यांसाठी वेदनादायी ठरले; तसेच ते काही काळ संपर्क आलेल्या माझ्या आईसारख्यांनाही मनाला चटका लावून गेले. मी २०१५ ला माझे स्वतःचे घर बांधले; पण मुक्काम करायला डॉक्टर कधीच येणार नव्हते. परंतु १० नोव्हें. २०१६ ला प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोलकर यांचे वर्धा शाखेतर्फे 'मानसिक आरोग्य : समाजव्यवस्था व अंधश्रद्धा' या विषयावर अनेकांत स्वाध्याय मंदिर (वर्धा) येथे व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी मी त्यांना माझ्या घरी भोजन व निवास करण्याचे निमंत्रण दिले आणि त्यांनीही त्याचा स्वीकार करून माझ्या घरी आले. छान गप्पा रंगल्या आणि डॉक्टरांची वर्धा भेटीतील काही आठवणी शेअर करीत आम्ही विश्रांती घेतली.

(लेखक महा. अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे सहकार्यवाह आहेत.)

●



# पुरोगामी चळवळीतील चौफेर व्यक्तिमत्त्व

**नितीन राऊत**, अलिबाग
९८२२०१०२७०

गोष्ट १९८९ सालची आहे. एका छोट्याशा वर्तमानपत्रात चार ओळींची बातमी वाचली. शांतीवन नेरे, (पनवेल) येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर आहे. तेव्हा हे माहीत नव्हते की, मी कुठल्यातरी परिवर्तनवादी संघटनेशी जोडला जाईन व पुढे अविरतपणे ३४-३५ वर्षे त्या प्रवासात जोडून राहीन. या शिबिरापूर्वी मी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करत होतो. परंतु याबद्दल शिबिरात जाऊन जाणून घेण्याची जिज्ञासा होती. या शिबिरामध्ये चाळीशीतील एक व्यक्ती खुर्चीत बसून मार्गदर्शन करत होती. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल उल्हास ठाकूर व प्रबोध दळवी यांच्याकडून कळले. त्यांनी माझ्याशी ओळख वाढवली व मला हे काम अलिबाग मध्ये देखील करावे असे सुचवले.

त्याचवर्षी महा.अंनिस अलिबाग शाखेची स्थापना झाली व पुढील काही महिन्यात उल्हास ठाकूर, प्रबोध दळवी, प्रदीप पाटकर, डॉ. प्रदीप पाटकर, अलका जोशी, शुभांगी शहा, बिपिन रणदिवे इत्यादी कार्यकर्त्यांच्या मदतीने अलिबाग येथे तीन दिवसांचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर तीन दिवस अलिबागमध्ये राहिले. त्यांच्याबरोबर प्रा. पराडे डॉक्टर, विद्याधर बोरकर वगैरे मंडळी होती. या शिबिरानंतर अलिबाग मध्येच डॉ. दाभोलकरांची जाहीर सभा झाली. या सभेच्यावेळी प्रास्ताविकाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. अशा प्रकारे डॉ. दाभोलकर यांची साथ व सहवास वाढत गेला. त्यानंतर मी व दिवंगत कार्यकर्ते निलेश घरत मिळून अंनिसच्या कामाचा रायगड जिल्ह्यामध्ये धडाका लावला. यानंतर डॉ. दाभोलकर यांचे रायगड जिल्ह्यात व अलिबागमध्ये येणे वाढत गेले. कोकणातील काही मोहिमांमध्ये रायगड जिल्ह्यामध्ये मी प्रामुख्याने भाग घेतला होता. त्यामध्ये 'शोध भुताचा बोध मनाचा' व 'चमत्कार सत्यशोधन' यात्रा, त्याचप्रमाणे सर्प उद्यान (कात्रज) यांचेसह 'सर्पयात्रा' वगैरे मोहिमा मोठ्या प्रमाणात पार पडल्या.

पनवेल येथे एका कार्यक्रमात सोनाली कुलकर्णी यांना डॉ. दाभोलकर यांनी निमंत्रित केले होते. त्यावेळी मी प्रेक्षकात बसलो होतो. याच कार्यक्रमात डॉ. दाभोलकर लिखित 'तिमिरातून तेजाकडे' या पुस्तकाचे लोकार्पण होणार होते. विचारमंचावर सोनाली कुलकर्णी व डॉ. दाभोलकर यांनी लोकार्पणासाठी पुस्तक हातात घेतले आणि अचानक मला स्टेजवर बोलावलं व त्या पुस्तकाच्या लोकार्पण कार्यक्रमात मला देखील सामील करून घेतले. एवढा मनाचा मोठेपणा डॉ. दाभोलकरच दाखवू शकतात. ते पुस्तक खूप गाजले, त्या कार्यक्रमातील स्वाक्षरी केलेले पुस्तक आजही मी जपून ठेवलेलं आहे.

२००८ च्या सुमारास अलिबागच्या दौऱ्यावर डॉ. दाभोलकरांसोबत असताना कर्जत येथे मा. राज ठाकरे यांनी मला भेटीस बोलावल्याचा फोन आला होता. त्यांचे स्विमिंग पूलचे काम मी करीत होतो. स्विमिंगपूल व लँडस्केपिंग हा माझा व्यवसाय आहे हे ऐकून त्यांना खूप आश्चर्य वाटले. आपला एक कार्यकर्ता महा.अंनिसचे काम झोकून देऊन करतो. एवढंच नाही, तर व्यवसायात देखील खूप मेहनतीने पुढे जात आहे. याचा त्यांना अभिमान वाटे. साताऱ्यावरून जाताना डॉक्टरांना मी नेहमी फोन करून भेटून पुढे जात असे. २०१२ साली मी रायगड जिल्हा महा. अंनिसचा अध्यक्ष असताना राज्यातील सगळ्या जिल्ह्यांमध्ये प्रेरणा मेळावे घ्यावेत असे संघटनेमध्ये ठरले. त्याची सुरुवात रायगड जिल्ह्यातून व्हावी असे डॉक्टर व अविनाश पाटील यांनी ठरवले. या प्रेरणा मेळाव्यामध्ये 'कृषीवल' दैनिकाचे संपादक संजय आवटे प्रमुख पाहुणे तर प्रा. डॉ. अनिल पाटील अध्यक्ष होते. डॉक्टरांच्या एका ऑडिओ सीडीचे व एका पुस्तकाचे लोकार्पण याप्रसंगी झाले होते. या मेळाव्यास अभूतपूर्व असे यश मिळाले. आघाडीच्या वृत्तपत्रांमधून प्रेरणा मेळाव्यावर अग्रलेख देखील छापून आले होते. डॉक्टर या प्रेरणा मेळाव्याचे सतत कौतुक करायचे आणि इतरांनादेखील सांगायचे.

२०१३ साली फेब्रुवारी महिन्यात डॉ. दाभोलकर यांचा मला रात्रीच्या वेळी कॉल आला होता. नेहमीप्रमाणे विचारपूस करून त्यांनी सांगितले की, ''नितीन आता तू

रायगड जिल्ह्याचं अध्यक्षपद सोड.'' मला काही कळेचना. थोडं आश्चर्य वाटलं. मी पण लगेच त्यांना होकार दिला. याच कारण सांगताना ते म्हणाले की, ''आपल्याला कोकणामध्ये आणि गोव्यापर्यंत संघटनेचं काम वाढवायचं आहे. कार्यकर्ते संघटित करून शाखा निर्माण करायच्या आहेत. त्यासाठी तुला मी सोबत घेणार आहे. तसेच तुझ्या मुलीचं देखील आता लग्न ठरलेलं आहे. जबाबदाऱ्या कमी झालेल्या आहेत. आता तू व्यवसाय बंद करून पूर्णपणे या कामात झोकून दे.'' मीसुद्धा त्यांचं म्हणणं ऐकलं आणि व्यवसाय कमी केला. त्यानंतर इस्लामपूरला जून २०१३च्या राज्य कार्यकारिणीमध्ये माझी राज्य सरचिटणीसपदी नेमणूक केल्याचं त्यांनी जाहीर केलं. डॉक्टरांचा हा दूरदर्शीपणा होता. पुढे ते माझ्यासोबत काम करण्यास राहिले नाहीत. परंतु मी रायगडबरोबरच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा आणि बेळगाव येथे जाऊन संघटनेचे काम वाढवण्याचा सातत्याने प्रामाणिक प्रयत्न केला. या पदावर मी सतत नऊ वर्षे काम केलं. इस्लामपूरच्या कार्यकारिणीमध्ये मला डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं होतं. तेव्हा विचारमंचावर डॉ. दाभोलकर, अविनाश पाटील, प्रा. आर्डे वगैरे वरिष्ठ मंडळी होती. याच वेळी मी परिवर्तनवादी कार्यकर्त्यांना पुरस्कार देण्यासाठी संघटनेस ६०,०००/- रुपये रक्कम दिली.

फेब्रुवारी २०१३ मध्ये माझ्या मुलीचे नम्रताचे लग्न रजिस्टर पद्धतीने होणार आहे हे समजल्यानंतर डॉक्टरांनी कौतुक केले होते. तसेच मे २०१३ मध्ये आयोजित केलेल्या स्वागत समारंभासाठी सातारा येथील चिंतन बैठक लवकरच आटोपून डॉ. दाभोलकर, अविनाश पाटील, सुशीला मुंडे, परेश शहा, विनायक सावळे, नंदकिशोर तळाशिलकर वगैरे मंडळी आवर्जून उपस्थित होती. स्वागत समारंभात परिवर्तनाचे स्लोगन्स, नेत्रदान, देहदानाची पोस्टर्स, पुस्तकांचे स्टॉल, अनाथ मुलांच्या संस्थेचा स्टॉल अशा विविध गोष्टी पाहून त्यांना खूप आनंद झाला. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रामध्ये त्यांनी याबाबत लेख लिहिला. पुण्यामध्ये एका कार्यक्रमातील भाषणांमध्ये माझ्या मुलीच्या लग्नाच्या स्वागत सोहळ्याबद्दल त्यांनी स्तुती केली. एका लेखात देखील त्यांनी म्हटलं आहे की, मी माझ्या मुलाच्या लग्नाला गेलो नाही, कारण लग्नातील कर्मकांड माझ्या मनाला पटणार नव्हतं. परंतु या परिवर्तनाच्या लग्नाच्या स्वागत सोहळ्यात मी आवर्जून आलो, कारण एक कार्यकर्ता व त्यात झालेला बदल व निर्भीडपणे घेतलेली नवीन भूमिका.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे रायगड जिल्हा व अलिबाग येथे संघटनेच्या कामाच्या निमित्ताने किंवा व्याख्यानाच्या निमित्ताने सतत येणे-जाणे होते. अलिबाग शाखेत महिलांची संख्या मोठी होती याचे त्यांना खूप कौतुक वाटे. आमच्या शाखेतील निर्मला फुलगावकर, संध्या कुलकर्णी, वैशाली पाटील, शुभांगी जोगळेकर, सुप्रिया जेधे वगैरे महिला कार्यकर्त्या डॉक्टरांशी मनमोकळेपणे गप्पा मारत आणि तेव्हा ते म्हणत की, तुम्ही खूप सगळे काम करता आणि माझं नाव पेपरमध्ये येतं. रायगड जिल्ह्यात जुलै २०१३ मध्ये महाड येथे कोकण विभागातील प्राध्यापकांसमोर त्याचं भाषण झालं. त्या भाषणानंतर त्यांनी आधी सांगितल्याप्रमाणे मी केवळ भाषणाला येणार नाही, तर संघटनेचे काम असेल किंवा शाखा भेटी असतील तरच येईन. त्याप्रमाणे मी जिल्हा अध्यक्ष म्हणून त्यांच्या माणगाव, तळा व म्हसळा या तीन शाखांच्या भेटी ठरवल्या. महाडचं भाषण झाल्यावर त्यांनी या तिन्ही शाखांना भेटी दिल्या. तळा येथे प्रा. भगवान लोखंडे यांच्या कॉलेजमध्ये डॉ. दाभोलकर यांचं फार सुंदर भाषण झालं. तो दिवस वटसावित्रीचा होता. त्या भाषणामध्ये त्यांनी खूप प्रभावीपणे प्रबोधनात्मक मार्गदर्शन केलं होतं. हे त्यांचे रायगड जिल्ह्यातील शेवटचं भाषण ठरलं.

अशा एका ध्येयवेड्या, तत्त्वनिष्ठ, विवेकवादी, पितृतुल्य साथीचा दि. २० ऑगस्ट २०१३ रोजी पंचवीस वर्षांचा असलेला सहवास संपला. परंतु एक गोष्ट निश्चित झाली होती की, डॉ. दाभोलकरांच्यामुळे महाराष्ट्र अंनिससारखी परिवर्तनाची मोठी संघटना माझ्यासारख्या खेड्यातून आलेल्या एका सामान्य कार्यकर्त्याला लाभली आणि त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्त्यांची साथ मिळाली. अविनाश पाटील, माधवराव बावगे, संजय बनसोडे, मच्छिंद्र मुंडे, सुशीला मुंडे, विनायक सावळे, परेश शाह, सुधीर निंबाळकर, तळाशिलकर, डॉ. गोराणे, शहाजी भोसले, सुरकार, संजय शेंडे, डॉ. नितीन शिंदे अशीच अनेक मंडळी खूप वर्षे कामात सोबत राहिली. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर आज जरी आपल्यात नसले तरी त्यांनी दिलेला मार्ग शेवटच्या श्वासापर्यंत न सोडता त्या मार्गावरून चालत परिवर्तनाच्या कामात स्वतःला झोकून देण्याचा निर्धार केला आहे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर या परिवर्तनाच्या मार्गदर्शकास दहाव्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र आदरांजली!

•

# डॉक्टर तुमची खूप आठवण येते!



**उत्तरेश्वर बिराजदार,** लातूर
९४२३०७५५०४

ज्यांनी आपल्याला घडवलं, वाढवलं, विचारांनी भरणपोषण केलं अशा माणसाची आठवण आयुष्याच्या अवघड वळणावर, संघटनेच्या अवघड वळणावरदेखील, विरक्तीच्या मूडमध्ये, विचाराच्या एकाग्रतेत, समाजाच्या राजकीय व सामाजिक स्थित्यंतरावेळी विचार करताना वेळोवेळी येते. अशा वेळी डॉक्टर असायला हवे होते असे वाटते म्हणूनच डॉक्टर तुमची खूप आठवण येते!

डॉ. नरेंद्र दाभोलकर सर (मी डॉक्टरांना कधीही डॉक्टर म्हणायचो नाही. नेहमी सर म्हणायचो) यांच्याबद्दल लिहिताना काय लिहावं असा प्रश्न पडला होता. त्यानुषंगाने काही आठवणी लिहाव्यात असे मनोमन ठरवले. त्यात असे सुटेसुटे काही असणार नाही. त्यात मला भावलेले डॉक्टर, डॉक्टरांची स्वभाववैशिष्ट्ये, त्यांचं चळवळीबद्दलचं योगदान, असा एकंदरीत सर्वच विषयांचा एकत्रित परिपाक असेल. आम्ही काही मित्रमंडळी नेहमी विविध विषयांवर चर्चा करायचो, बोलायचो. प्रत्येक जण आपआपले मत ठासून बोलायचा, मांडायचा, वादविवाद व्हायचे व खंडणमंडण व्हायचे. वर्तमानपत्रातील लेखावर चर्चा व्हायची. हल्ली मोबाईलमुळे संवाद कमी होतोय. खरं सांगायचं, तर कधी कधी समोरच्याचे विचार पटायचे; पण आपण आपला हेका सोडायचा नाही असे तरुणाईमध्ये चालायचे. याच काळात डॉक्टरांचे वर्तमानपत्रातील लेख वाचनात आले व आवडले. आपण या विषयावर काम करावे असे अजिबात डोक्यात नव्हते; पण अंधश्रद्धेबाबत मनामध्ये चीड होती हे मात्र नक्की! डॉक्टरांना पत्रं लिहिली, प्रश्न विचारले, योग्य उत्तरे डॉक्टरांकडून यायची. असा पत्रव्यवहार चालायचा. डॉक्टरांची आठवण म्हणून काही पत्रे मी अजूनही जपून ठेवली आहेत. हे सर्व करताना डॉक्टरांनी शाखा स्थापन करण्यासाठी पा.नं.निपाणीकर सरांना लातूरला पाठवतो म्हणाले. परंतु त्यांच्या काही अडचणींमुळे ते येऊ शकले नाहीत. पण त्यांनी देशपांडे नावाच्या एका तरुण कार्यकर्त्याला पाठवलं. खरं तर, आम्ही पडलो इंजिनिअरिंगचे विद्यार्थी. सतत अभ्यास, टर्मवर्क, प्रॅक्टिकल बुक्स व परीक्षा या रहाटगाडग्यातलं जीवन. समाजकार्य, चळवळ, एन.एस.एस., पुरोगामी, प्रतिगामी या गोष्टींचा गंधही नव्हता. पण झालं असं की, अंनिसच्या शाखा स्थापनेच्या पहिल्याच बैठकीस बऱ्यापैकी पुरोगामी, परिवर्तनवादी विचाराची मंडळी होती. त्यात होते माधव बावगे सर. म्हणून बावगे सर माझी ओळख करून देताना नेहमी माझ्या अगोदरचे व मला चळवळीत आणलेले असे सांगतात.

पुढे १० व ११ सप्टेंबर १९९२ ला पहिले प्राथमिक शिबिर झाले. डॉक्टर सतत दोन दिवस बोलत असायचे. डॉक्टरांना ऐकले व आम्ही आरपार बदललो. डॉक्टरांची विलक्षण बुद्धिमत्ता, प्रचंड अभ्यास, विषयाची सूत्रबद्ध मांडणी, मधेच सामाजिक विषयावरील मनाला भिडणाऱ्या कविता, यामुळे जीवनाकडे पाहाण्याच्या दृष्टीसह समाजाप्रति असलेली आपुलकीची भावना दृढ होत गेली. पुढे बावगे सरांच्या झपाटून काम करण्याच्या स्वभावामुळे लातूर व जिल्ह्याचे काम अनेक अंगाने वाढत गेले. डॉक्टरांचे लातूर शाखेवर किंबहुना लातूर जिल्ह्यावर विशेष प्रेम होते. डॉक्टर नेहमी म्हणायचे, ‘‘मी लातूरला येतो व कार्यकर्त्यांकडून ऊर्जा घेऊन जातो.’’ खरं तर, त्यांच्यातच खूप मोठी ऊर्जा असायची; पण संघटनेच्या कार्यकर्त्यांवर शाबासकीची पाठ थोपटण्याचा तो भाग होता. कार्यकर्ता जोडणे डॉक्टरांना छान जमायचे म्हणून डॉक्टर उत्कृष्ट संघटक होते. विविध विषयांवरील चर्चासत्रे, परिषदा, आंदोलने, मोहिमा या लातूर जिल्ह्याने आयोजित करून व ते लीलया यशस्वी करून संघटनेला बळ दिलेले आहे. अशा अर्थाने डॉक्टरांचे लातूरवर विशेष प्रेम होते. वैज्ञानिक जाणिवा कृतिपरिषद, अंधश्रद्धा निर्मूलनाचा जाहीरनामा परिषद, जोडीदाराची विवेकी निवड या विषयावरील आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहितांची संकल्प परिषद, भानामती प्रबोधन धडक मोहीम या व असे अनेक कार्यक्रम घेऊन विविध

विषयांवरील ठराव मान्य करून शासनास सादर करून डॉक्टरांनी पाठपुरावा केला आहे. यावरून त्यांचा दूरदृष्टीपणा व त्यांचे काळाच्या किती तरी पुढचं व्हिजन असायचे, हे लक्षात येते.

१ ते ६ मे १९९९ लातूर जिल्ह्यामध्ये भानामती प्रबोधन धडक मोहीम हाती घेण्यात आली होती. माझ्या मते, संपूर्ण देशात अशी मोहीम बिगर शासकीय संस्थेने घेतली असावी असं ऐकण्यात व वाचण्यात आलेले नाही. या मोहिमेचा थोडक्यात भाग असा १ मे रोजी संध्याकाळी उद्घाटनानंतर सात तालुक्यात सात जथ्थे. एका जथ्थेत एक कार्यकर्ता भानामतीचे मानसशास्त्र समजून सांगणारा, चमत्काराचे प्रयोग करणारा कार्यकर्ता, एक पुस्तक विक्री करणारा कार्यकर्ता व अन्य एक वाहनचालकासह कार्यकर्ता तसेच आठवा जथ्थे माधव बावगे सरांसह डॉक्टरांचा. प्रत्येक जथ्थे सकाळी ८ वाजल्यापासून ठरवून दिलेल्या मार्गाने दररोज ५ ते ६ कार्यक्रम करायचा असे एकूण २४० गावांत (ग्रामीण भागात) पाच दिवसांत प्रबोधनाचे कार्यक्रम घेणे हे अवघड काम कौशल्याने पूर्ण केले. डॉक्टर यासाठी अनेक वेळा लातूरला आले. बैठका घेतल्या. काटेकोर नियोजन केले. डॉक्टरांच्या नेतृत्वात माधव बावगे सरांच्या झपाटलेपणात व आम्हा कार्यकर्त्यांच्या क्षेत्रीय नियोजनातून ही मोहीम यशस्वी झाली. या मोहिमेचा समारोपाचा कार्यक्रम उदगीर येथे होता. समारोपाच्या कार्यक्रमावेळी सर्व जथ्थे एकत्र आले. त्यावेळेस मी डॉक्टरांना म्हणालो, ''डॉक्टर, आपण हे युद्ध जिंकलं.'' त्यावेळी डॉक्टर मनोमन सुखावलेले दिसून आले.

वैज्ञानिक जाणिवा शिबिरे हे लातूर जिल्ह्यात साधारणपणे सलग दहा वर्षे प्रत्येक तालुक्यात व्हायचे व जिल्ह्यासाठी एक माध्यमिक शिक्षकांसाठीचे निवासी शिबिर लातूर येथे व्हायचे. सुरुवातीच्या काळात माध्यमिक शिक्षकांसाठीच्या शिबिरास डॉक्टर दोन दिवस हमखास असायचे. मी डॉक्टरांना अनुभवलंय. सर्व विषय सलग दोन दिवस न थकता मांडणी करायचे. प्रश्नोत्तरे द्यायचे. त्यामुळे शिक्षक तयार झाले व कार्यकर्ते बनले. त्याचा चळवळीच्या कामाला फायदा झाला. मला आठवतोय कायद्याच्या लढाईतला तो प्रसंग. नागपूरचे अधिवेशन चालू होते. राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख लातूरचे. डॉक्टर व माधव बावगे सर सत्याग्रही उपोषणास बसले होते. विषय होता जादूटोणाविरोधी कायद्याच्या मंजुरीच्या प्रक्रियेत होत असलेल्या विलंबाचा. सलग तेरा दिवस उपोषण चालले. लातूर शहर व परिसरातील सामान्य मंडळी, सामाजिक क्षेत्रातील समविचारी व पुरोगामी मंडळी येऊन भेटत असत व उपोषणास पाठिंबा देत असत. पण राजकीय क्षेत्रातील पुरोगामी मंडळी उपोषण स्थळाकडे फारसे फिरकले नाहीत, मी डॉक्टरांना या गोष्टीची जाणीव करून दिली असता डॉक्टर जे म्हणाले ते विचार करण्याजोगे होते. डॉक्टर असे म्हणाले की, ''आपल्याला अपमान सहन करूनच पुढे जावे लागेल.''

लातूरच्या गांधी चौकातला तो कोपरा मी पाहातोय. समोर गांधीजींचा पुतळा, डाव्या बाजूला महालक्ष्मीचे मंदिर, पाठीमागे खवय्या मंडळींचे ठेले. डॉक्टर व बावगे सर सलग तेरा दिवस उपाशी. कार्यकर्ते प्रचंड बेचैन. उपोषणाचा साधारण नववा किंवा दहावा दिवस असावा. डॉक्टरांच्या पोटात दुखू लागलं. कळ येऊ लागली. अंतर्गत वेदना किती असतील याची मला जाणीव नाही. परंतु तशातच डॉक्टरांनी मला बाजूला घेतलं. मला बाईक काढायला लावली व सरळ घरी चल म्हणाले. मी प्रचंड घाबरलो. डॉक्टरांनी माझ्या खांद्यावर दोन्ही हात ठेवले. प्रचंड अशक्तपणा. डॉक्टर घरी आले व वॉशरूम जवळ केली. घरात केवळ दोन मिनिटे आडवे झाले. माझ्या घरच्यांना उपोषणाबाबत सर्व कल्पना होतीच. सगळ्यांनी आग्रह केला, चहा घ्या, दूध घ्या. केवळ साखरपाणी तरी घ्या, डॉक्टरांनी काहीच घेतले नाही. आग्रहास्तव दोन घोट पाणी प्याले इतकेच. डॉक्टर फ्रेश झाले. मी डॉक्टरांना न राहावता प्रश्न विचारला, ''आपण तर गेली दहा दिवस काहीच घेतले नाही आणि हे असं कसं काय?'' त्यावेळी डॉक्टर म्हणाले, ''खरं सांगू, मी डॉक्टर आहे मला माहीत आहे. कदाचित माझ्या आतड्याच्या अंत:त्वचेचे सालटे निघत असावेत (आपल्या तळहाताचे सालटे निघावे तसे); पण काळजी करू नकोस. मी एकदम बरा आहे.'' या सर्व प्रसंगातून एक लक्षात येईल, डॉक्टरांनी कायद्याची लढाई किती विधायक मार्गाने, लढवय्या बाण्याने लढली आहे. एवढा त्रास असतानाही त्यांनी माझ्या घरी दोन घोट पाण्याशिवाय काहीच घेतले नाही. ही त्यांची पराकोटीची

नैतिकता. सतत विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, वैज्ञानिक जाणिवा, विज्ञान बोधवाहिनी, खगोलविज्ञान व मनोरंजनातून विज्ञान या अंगांने सतत विज्ञानाचा ध्यास असलेल्या डॉक्टरांना व त्याच्या चळवळीच्या विचारांना विरोध करणाऱ्या मंडळींनी विचारांनी कधीच उत्तर दिले नाही. उलट तो विवेकी विचारच नष्ट करावा या करंट्या मानसिकतेतून डॉक्टरांचा खून केला. आज सर्वच क्षेत्रात धार्मिक उन्मादाचे वातारण आहे. जातीय व धार्मिक अहंकार जोपासले जात आहेत. यासाठी काही सामाजिक व राजकीय यंत्रणा जाणीवपूर्वक प्रयत्न करताना दिसत आहेत. विवेकी विचारांची थट्टा केली जातेय. अशा वेळी मन विरक्त मूडमध्ये जाते की काय अशी भीती वाटत असताना वाटते, 'डॉक्टर, तुम्ही हवे होता हो! म्हणूनच डॉक्टर तुमची खूप आठवण येते आणि गलबलून जातंय हो!'

•

## • राज्यव्यापी संघटना बांधणी प्रशिक्षण शिबिर •

नाशिक येथील सीटू कामगार भवनात दि. ८ व ९ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्षव जिल्हा प्रधानसचिव यांचे संघटना बांधणी प्रशिक्षण शिबिरउत्साहात संपन्न झाले. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी उपस्थितांना जबाबदारीची जाणीव करून दिली. शिबिरामध्ये राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी 'संघटना बांधणी तथ्य व पथ्य', डॉ.ठकसेन गोराणे यांनी'संघटनेची कार्यसंस्कृती, मूल्ये आणि आचारसंहिता', राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी 'अशी शाखा असे कार्यकर्ते' व 'मी नेता माझ्या जिल्ह्याचा' तर विजय परब यांनी 'शाखा बैठक' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले व प्रशिक्षणार्थींच्या शंकांचे निरसन केले.




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती समाजातील अंधश्रद्धांचे निर्मूलन करते. एवढेच नाही, तर समाजातील विविध क्षेत्रांत विवेकाशी विसंगत घटना घडताना हस्तक्षेपही करते. यापुढेही हे काम सुरूच राहील, असा आशावाद संघटनेचे राज्य उपाध्यक्ष उत्तम कांबळे यांनी व्यक्त केला. आधुनिक तंत्रज्ञानाचा संघटना विस्तारासाठी कशा प्रकारे वापर करता येईल, याविषयी संगणकतज्ज्ञ सुनील खांडबहाले यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या टप्प्यातील या शिबिरासाठी महाराष्ट्रातील ३५ जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेच्या प्रशिक्षण विभागाचे राज्यकार्यवाह सुरेश बोरसे यांनी केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी नाशिक येथील अंनिसचे कृष्णा चांदगुडे, प्रा. डॉ. सुदेश घोडेराव, राजेंद्र फेगडे, प्रल्हाद मिस्त्री, डॉ. श्यामसुंदर झळके, नितीन बागुल, महेंद्र दातरंगे, अॅड. समीर शिंदे, अरुण घोडेराव, दीपक वर्दे, प्रथमेश वर्दे, विशाल गोराणे तसेच सीटूचे सिताराम ठोंबरे, तुकाराम सोनजे, मोहन जाधव, केदार यांनी विशेष परिश्रम घेतले.



# विज्ञान संपते तिथे...

**जगदीश काबरे,** सांगली
९९२०१९७६८०

हल्ली अध्यात्माबद्दल अनेक तऱ्हांनी बोलले जाते. 'जिथे विज्ञान संपते, तिथे अध्यात्म सुरू होते' किंवा 'विज्ञानाची परिणती शेवटी अध्यात्मातच होते' असे म्हणण्याचा जणू प्रघातच पडला आहे. इस्रोचे वैज्ञानिकही याला अपवाद नाहीत. विज्ञानापेक्षा अध्यात्मच कसे श्रेष्ठ हे ठसविण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. २८ फेब्रुवारी हा 'विज्ञान दिन' म्हणून आपण साजरा करत असतो. त्याच दरम्यान कणेरी मठ येथील 'पंचमहाभूत मंगलम्' या कार्यक्रमामध्ये इस्रोचे प्रमुख शास्त्रज्ञ एल. बी. शर्मा यांनी अशा प्रकारचे विधान करून एकविसाव्या शतकातील भारत कोणत्या देशाने चालला आहे, हे लक्षात आणून दिले आणि मन विषण्ण झाले. जर शास्त्रज्ञच अशा प्रकारचे अवैज्ञानिक विधान करत असतील तर सामान्य माणसाची काय कथा!

आपल्याकडे शिक्षणाने माणूस डॉक्टर, शास्त्रज्ञ होतो. पण त्याच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होईलच असे नाही. तो फक्त पुस्तकी ज्ञानाने तंत्रकुशल होतो. परिणामी, तो उत्तम वैज्ञानिक उपकरणे आणि अवकाश यानांचीही निर्मिती करू शकतो. पण तो विवेकी विचारांनी प्रगल्भ होतोच असे नाही. म्हणजे असे की, त्याला शिक्षणामुळे हे नक्की माहीत असते की, ऊर्जा निर्माणही होत नाही आणि नष्टही; पण तरीही अनामिक ऊर्जेने बाबाने हवेतून काढलेल्या वस्तू पाहून तो त्या बाबाच्या तथाकथित चमत्काराला बळी पडतो. कारण माणसांचे विचार हे भावनांशी निगडित असतात म्हणून विचार हे सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकतात. त्याउलट ऊर्जेला भावना नसतात म्हणून त्या सकारात्मक किंवा नकारात्मक असूच शकत नाहीत. ऊर्जा ही भौतिक राशी असल्यामुळे ती तटस्थच असते. तरीही धर्ममार्तंड सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जेबद्दल जे सांगेल ते भान हरपून वैज्ञानिकही ऐकतो. यालाच मानसिक गुलामी म्हणतात. जी घराघरांतून संस्काराच्या नावाखाली वाढवली जात असते. इस्रोमधील काही शास्त्रज्ञ याच गुलामी मानसिकतेचे बळी असतात. म्हणून ते पूजा-अर्चेचे कर्मकांड करतात. हातात गंडे-दोरे आणि बाबाबुवांच्या अंगठ्याही घालतात. थोडक्यात काय तर, ही सगळी शिक्षित मंडळी या अंधश्रद्ध समाजातूनच जन्माला आलेली आहेत. त्यांच्यावर लहानपणापासून देवाधर्माच्या कर्मकांडांचे, कुळाचार पाळण्याचे आणि देवाविषयी भीती बाळगण्याचे संस्कार होतात म्हणून जोपर्यंत ते विवेकाने विचार करून स्वतः स्वतःशीच झगडून आपले विचार बदलत नाहीत तोपर्यंत ते प्रवाहपतितासारखेच जगत असतात. म्हणून ते पंचमहाभूतांचा संबंध धर्माशी लावून धर्माला वैज्ञानिक ठरवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतात.

विज्ञानाला मर्यादा आहेत हे वैज्ञानिकही मान्य करतात. ते त्याची शास्त्रीय कारणमीमांसाही देऊ शकतात. पण अध्यात्माचे श्रेष्ठत्व ठसवणारी मंडळी अध्यात्म म्हणजे नेमके काय याविषयी स्पष्टपणे स्पष्टीकरण देऊ शकत नाहीत. ते बरेचदा गोलमाल वाक्ये पेरून शाब्दिक फुलोऱ्याने माणसाला भावनाकुल करून आपल्या कह्यात घेत असतात. पण 'विज्ञान संपते तिथे अध्यात्म सुरू होते', असे म्हणणाऱ्यांना, विज्ञान नेमके कोठे संपते हे निश्चितपणे सांगता येत नाही. कारण त्याचे निश्चित गमक उपलब्ध नाही. ते उपलब्ध होण्याची शक्यताही नाही. कारण विज्ञान ही एक सततची निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. वैज्ञानिक संकल्पनांची व सिद्धांताची सत्यता प्रयोगाद्वारे कोणालाही पडताळून पाहाता येते. पण अध्यात्मातील संकल्पनांची सत्यता अशा रीतीने पडताळून पाहाता येत नाही म्हणूनच विज्ञानाची परिणती अध्यात्मात होते म्हणजे नेमके काय होते, हे कोणीच स्पष्टपणे सांगू शकत नाही. मग विज्ञानाची परिणती अध्यात्मात होते असे कसे म्हणता येईल? अध्यात्माचा आणि ते मांडणाऱ्या संतवाङ्मयाचा अभिमान जरूर असावा; पण विज्ञानाला कमी लेखले जाऊ नये. गंमत म्हणजे 'जिथे विज्ञान संपते तिथून अध्यात्म सुरू

होते', असे हास्यास्पद विधान करणारे बरेचदा धर्मातील कोणत्याही कर्मकांडामागे विज्ञान कसे आहे हे हिरिरीने मांडत असतात आणि आमचा धर्म कसा वैज्ञानिक आहे हे सांगण्याचा आटापिटाही करतात. यावरून हे सिद्ध होते की त्यांचे वरील वाक्य किती पोकळ आहे ते!

मुळात विज्ञान हे भौतिक घटनांनी बद्ध असल्यामुळे त्याला कुठल्याही मानवी भावना नसतात. या अर्थाने ते तटस्थ आणि भावनाशून्य असते. परंतु त्याचा वापर करणारा मानवी मेंदू भावनाशील असल्यामुळे जर भावना बुद्धिपेक्षा प्रबळ असतील तर तो विज्ञानाचा दुरूपयोग करतो आणि जर भावनांवर बुद्धीचा अंकुश असेल तर तो विज्ञानाचा विधायक म्हणजेच सदुपयोग करतो. थोडक्यात, विज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. त्याची कोणती बाजू वापरावी हे सर्वस्वी मानवाच्या संस्कारावर आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर अवलंबून असते. तेव्हा विज्ञानाला दोष देऊन धर्मअंध भक्त स्वतःची सुटका करून घेऊ शकत नाही. असे अध्यात्माचे श्रेष्ठत्व मानणारी माणसे मग सांगोवांगीचे 'जिथे विज्ञान संपते तिथे अध्यात्म सुरू होते', अशी टाळ्याखाऊ अस्मिता गोंजारणारी आणि भावनेच्या पुरात वाहून जाणारी वाक्ये फेकून स्वतःच्या बुद्धीलाही कमी लेखतात, हे त्यांच्या गावीही नसते. वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अभावामुळे माणूस उच्चशिक्षित झाला तरी धर्मांध, अंधश्रद्ध, चुकीच्या अस्मिता गोंजारणारा, जातीसाठी माती खाणारा आणि आपल्या धर्माची श्रेष्ठता सांगण्यासाठी बेभान होऊन इतर धर्मीयांना तुच्छ लेखणारा असू शकतो. पण वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला माणूस मात्र सर्वसमावेशक वृत्तीचा असतो. प्रत्येक घटनेचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून साधकबाधक विचार करणारा असतो. अशा लोकांचीच आज भारताला गरज आहे. थोडक्यात, 'विज्ञान संपते तेथून अध्यात्म सुरू होते', हे विधान म्हणजे 'जिथे प्रकाश संपतो तिथून अंधार सुरू होतो', असे म्हणण्यासारखे आहे.

(लेखक ज्येष्ठ विचारवंत आहेत.)

●

## ३४ वा वर्धापन दिन

आपल्या संघटनेला येत्या ९ ऑगस्टला ३४ वर्षे पूर्ण होत आहेत. संघटनेची ही यशस्वी वाटचाल अभिमानास्पद आहे. आपण आपल्या शाखेत संघटना स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करावा. या निमित्ताने जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित करावेत. त्यामध्ये कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा, कुटुंबमेळावा, प्रबोधनात्मक कार्यक्रम संयोजित करावा. संघटनात्मक कार्याचा आढावा या कार्यक्रमात घ्यावा. समाजमाध्यमात आपल्या इमेजेस, पोस्ट प्रसारित कराव्यात.

## २० ऑगस्ट २०२३

महाराष्ट्र अं.नि.स.चे संस्थापक कार्याध्यक्ष शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाला येत्या २० ऑगस्टला १० वर्षे पूर्ण होत आहे. गेल्या १० वर्षात संघटनेच्या वतीने या निर्घृण खुनाचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. राज्यभर निषेध मोर्चे, निर्भय फेरी, आंदोलने केली आहेत. संपूर्ण देशात विविध संघटना व संस्थांच्या वतीने या घटनेचा निषेध नोंदवला आहे. हिंसा के खिलाफ मानवता की ओर, जवाब दो, अशी निषेधाची अनेक आंदोलने केली आहेत. यावर्षी आपल्याला शाखेत/जिल्ह्यात डॉ. दाभोलकरांच्या खुनाचा निषेध करण्यासाठी देशातील तपासयंत्रणा डॉ. दाभोलकरांच्या खुनाचे मारेकरी व सूत्रधार यांना शिक्षेपर्यंत पोहचू शकली नाही. याचा संताप व राग शांततेच्या, अहिंसक मार्गाने व्यक्त करायचा आहे. तसेच शासनस्तरावर निवेदने देण्यात यावी.

## महा.अंनिसच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रम

- शनिवार, दि.१९ ऑगस्ट २०२३ सायंकाळी ५.३० वा., विठ्ठल रामजी शिंदे पूल, पुणे मेणबत्ती/मशाल प्रज्वलित करून डॉ. दाभोलकरांचे स्मरण.
- रविवार, दि.२० ऑगस्ट २०२३ सकाळी ७.३० वा. विठ्ठल रामजी शिंदे पूल, पुणे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर अभिवादन, मूक निषेध मोर्चा (विठ्ठल रामजी शिंदे पूल ते एस. एम. जोशी फाऊंडेशन, पुणे)

**वेळ** : सकाळी ९.३० ते दु. १.३० वा. राज्यस्तरीय निषेध व निर्धार मेळावा

**स्थळ :** एस. एम. जोशी फाऊंडेशन, पत्रकार भवनशेजारी, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे

# माझा अंनिसमधील प्रवेश



**प्रा. डॉ. दशरथ भिसे,** लातूर
८८३०८७०१५५

मी जवळपास १९९३ पासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जोडला गेलेलो आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयांमध्ये अकरावी आर्ट्सला ॲडमिशन घेत असताना ॲडमिशन खिडकीवरती माधव बावगे सरांची ओळख झाली आणि तेव्हापासूनच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी मी जोडला गेलो. प्रत्यक्ष कामाला सुरूवात व्यंकटेश विद्यालय, लातूर येथे तत्कालीन कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शिक्षकांच्या शिबिरापासून झाली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे विचार ऐकून माझ्या अनेक प्रश्नांची उत्तरं मला मिळाली, जे प्रश्न मला अगदी लहान वयापासून पडलेले होते, त्यांची उत्तरे कोणीही देऊ शकलेले नव्हते. दाभोलकरांचे विचार ऐकून मी अवाक् झालो आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम करण्याचे ठरवले. १९९५-९६ ला मी आमच्या गावात प्रा.ओमप्रकाश मदनसुरे आणि माधव बावगे सर यांचा सप्रयोग कार्यक्रम घेतला, त्या कार्यक्रमाचा गावांमधील सकारात्मक बदलासाठी खूप परिणाम झालेला दिसून येतो.

शालेय जीवनापासूनच अगदी इयत्ता तिसरी-चौथी मध्ये असलेला एक प्रसंग मला आठवतो, आमच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये पाणी पिण्यासाठी एकच हातपंप (हापसा) होता. त्या हातपंपावर दलित मुला/ मुलींनी पाणी प्याल्यानंतर सवर्ण मुली पाणी प्यायच्या नाहीत, मात्र आमच्यापैकी कोणी पाणी पिल्यानंतर त्या पाणी प्यायच्या. मी माझ्या मित्रांना विचारायचो, 'हे असे का?' तेव्हा ते सांगायचे, 'ते दलित मुलं-मुली घाण राहातात म्हणून ते पाणी पिल्यानंतर सवर्ण मुली पाणी पीत नाहीत.' काही सवर्ण मुलं अतिशय घाण राहायचे. ते पाणी प्याल्यानंतर मात्र सवर्ण मुली पाणी प्यायच्या, मग मी परत माझ्या मित्रांना विचारायचो, 'हे असे का?' तेव्हा मला उत्तर मिळायचे, 'दलित मुलं-मुली मटण खातात.' मटण खाणारी काही सवर्ण मुलेही होती, ती पाणी पिल्यानंतर मात्र सवर्ण मुली पाणी प्यायच्या. मग मी माझ्या मित्रांना विचारायचो, 'हे कसे?' तेव्हा माझे मित्र मला चिडून सांगायचे, 'याचे उत्तर त्या मुलींनाच जाऊन विचार.' मात्र याचे उत्तर मला ना त्या मुलींनी दिले, ना समाजातील दुसऱ्या घटकांनी दिले.

दुसरा एक प्रसंग आठवतो, शाळा सुटल्यानंतर मला वडिलांच्या दुपारच्या भाकरी घेऊन शेतात जावे लागत असे. एके दिवशी माझा दलित मित्र लक्ष्मण माझ्यासोबत शेतात येतो म्हणाला, त्याची वाट पाहात मी गावाच्या वेशीजवळ थांबलो, तो लवकर येत नाही हे लक्षात आल्यानंतर मी त्याच्या घराकडे गेलो, ते माझ्या आजीने पाहिले. आजीने मला बोलावून पाठीत एक रपाटा मारला आणि सांगितले, 'बापाला काय उपाशी ठेवतोस का?' माझ्या लक्षातच आले नाही काय झाले ते, आजीने दुसऱ्या दोन भाकरी बनवून दिल्या आणि सांगितले, 'बापाला काही सांगू नको, नाहीतर फुकाट मार खाशील.' तरीही माझ्या काही लक्षात आले नाही. मी लक्ष्मणला विचारले. लक्ष्मण म्हणाला, 'माझ्या पण काही लक्षात आले नाही. तुझ्या आजीने असे का केले ते.' मी माझ्या दुसऱ्या मित्रांना विचारले. झालेला प्रसंग सांगितला, तेव्हा त्यांनी असे सांगितले की, 'लक्ष्मण दलित आहे आणि त्याच्या घरी तू तुझ्या वडिलांच्या भाकरी घेऊन गेलास म्हणून आजीने तुला मारले व दुसऱ्या भाकरी करून दिल्या.' मग मी ठरवलेच, दलित माणसाच्या हातच्या भाकरी खाल्ल्यानंतर काय होते ते तपासायचे. म्हणून मी दररोज लक्ष्मणला घेऊन शेतात जायचं, जाताना भाकरी लक्ष्मणच्या हातात द्यायच्या आणि वडिलांना काही सांगायचे नाही, वडिलांकडे लक्ष द्यायचे त्यांना काय होते का? परंतु वडिलांना काहीही झाले नाही. माझ्या लक्षात आले, दलितांच्या हातच्या भाकरी खाल्ल्यानंतर काही होत नाही. हा फक्त जातीभेद आहे, परंपरेने चालत आलेला आहे

म्हणून पुढच्या पिढ्याही पुढे चालवत आहेत. मी मात्र लक्ष्मणच्या घरी चहा प्यायचं, जेवण करायचं. लक्ष्मण मात्र आमच्या घरी यायचा नाही, त्याला घरातही प्रवेश नसायचा, याचे मला खूप शल्य वाटायचे.

दलित लोकांना चहा पिण्यासाठी आमच्या घराच्या समोर एका भिंतीला दिवळी होती, त्या दिवळीत एक कप आणि बशी ठेवलेली असायची. दलित लोक त्याच कप-बशीमध्ये चहा प्यायचे आणि धुऊन त्याच दिवळीमध्ये ठेवायचे. मला वाटायचे, ते आपल्या घरातील कप-बशीमध्ये चहा का प्यायचे नाहीत. मी अनेकांना विचारले, परंतु त्यांनी वेगवेगळी उत्तरं दिली. दलित लोकांना मंदिरामध्येही प्रवेश दिला जात नसे. मात्र त्यांच्याकडून अखंड हरिनाम सप्ताहासाठी पट्टी वसूल केली जात असे. काल्याच्या कीर्तनानंतर दलित लोकांच्या पंगतीही वेगळ्या असायच्या. त्यांना त्यांच्या घरूनच ताट, वाटी, पाणी पिण्यासाठी पेला घेऊन यावे लागत असे. सवर्ण लोकांना मात्र घरून काही आणण्याची आवश्यकता नसायची. मी विचारायचो, 'हे असे का?' मात्र याचे उत्तर मला उडवाउडवीचीच मिळायची.

आमच्या घरातील लग्नात दलित वस्तीतील सर्व लोक महिनोन्‌महिने राबायचे. मात्र त्यांच्या लग्नासाठी आम्ही अक्षदा टाकण्यासाठीही जायचो नाही. हा दुजाभाव माझ्या मनात त्यावेळीही खूप शल्य निर्माण करायचा. त्यांच्या नावाच्यासमोर त्यांची जात असायची. उदाहरणार्थ : महार, चांभार, लोहार, सुतार, मांग. प्रारंभी तर मला असे वाटायचे की, हे त्यांचे आडनावच आहेत; परंतु नंतर-नंतर कळायला लागलं की ही त्यांची जात आहे म्हणून. जर त्यांची अशी नावे नसती तर त्यांची जात पुढच्या पिढीला कळालीच नसती, ती कळावी म्हणूनच कदाचित अशी नावे ठेवली असावीत असे मला वाटते.

दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था स्वतंत्र असायची. काही तांत्रिक अडचणींमुळे ती बंद पडली असता त्यांना सवर्ण वस्तीमधून पाणी घेऊन जाण्यास बंदी असायची. मात्र दुष्काळी परिस्थितीत सवर्ण वस्तीतील सर्वच पाण्याची व्यवस्था बंद पडली आणि दलित वस्तीतील एकच हातपंप चालू राहिला, त्यावेळी मात्र सवर्ण वस्तीतील सर्व लोक दलित वस्तीतून पाणी आणताना मी डोळ्यांनी पाहिले आहे आणि तेव्हा दलित वस्तीतील कोणीही अडवलेले नाही हे देखील मी पाहिलेले आहे. या उदाहरणावरून जातीभेद कमी होण्यास मदत झालेली आहे, दिवसेंदिवस कमी होण्यास मदत होत आहे, याचा आनंददेखील आहे. असे हे सर्व असूनही दलित आणि सवर्ण मध्ये कधीही भांडण झालेले माझ्या निदर्शनास आले नाही, माझे वडील दलित आणि सवर्णांमध्ये नेहमीच समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करायचे. ते ग्रामपंचायत निवडणूक देखील दलित वस्तीतून लढायचे आणि बहुमताने निवडून यायचे, दलित वस्तीतील नवीन पिढी शिकू लागली ती नवीन पद्धतीने आमच्यासोबत समन्वय साधण्याचा प्रयत्न करू लागली. मी त्यांना अनेक वेळा सांगितले, तुम्ही शिवजयंतीमध्ये सहभागी व्हा, आम्ही आंबेडकर जयंतीमध्ये सहभागी होऊ, गावामध्ये एक समन्वयाचे वातावरण तयार करू, मात्र त्याला अजून तेवढा प्रतिसाद मिळालेला नाही, याचेही शल्य माझ्या मनात आहे. पण मला अजूनही आशा आहे की, येणाऱ्या काळामध्ये आंबेडकर जयंतीचा अध्यक्ष सवर्ण आणि शिवजयंतीचा अध्यक्ष दलित कुटुंबातील होईल आणि जातीभेदाच्या बेड्या तुटल्या जातील, जय हिंद!

•

## विनम्र अभिवादन



**भाई अशोक देशपांडे**, गांधीवादी, सर्वोदय कार्यकर्ते व बेळगाव अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष  भाई अशोक देशपांडे यांना भावपूर्ण आदरांजली



# सफरचंद : सलोखा अधोरेखित करणारे नाटक

**उत्तम जोगदंड**, कल्याण
९९२०१२८६२८

सरगम व अमरदीप निर्मित आणि कल्पकला प्रकाशित 'सफरचंद' या नाटकाविषयी बरेच काही ऐकले होते. 'कोड मंत्र' या यशस्वी नाटकाच्या टीमचे हे नाटक असल्याची जाहिरात पाहिली होती. दोन भव्य फिरते रंगमंच, रंगमंचावर बर्फवृष्टी, शिकारा आणि साक्षात काश्मीर उभे केल्याचे ऐकले होते. सफरचंद हे नाव, सोबत काश्मीरचा उल्लेख, जाहिरातीत दिसणारा फौजी जवान, मुस्लीम बांधव हे सारे पाहून नाटक पाहाण्याची उत्सुकता जागी झाली आणि त्याच वेळी सुधीर निंबाळकर यांनी नाटकाचे तिकीट उपलब्ध करून दिल्याने हे नाटक पाहाण्याचा योग आला. मीनाक्षी सुधीर निंबाळकर यांचे निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान आहे.

नाटक सुरू झाले. पडदा उघडल्याबरोबर समोर दिसणाऱ्या दृश्याने मनावर अक्षरशः गारूड केले. पांढऱ्या धुराच्या साहाय्याने तयार केलेले सरोवर, त्या सरोवराच्या काठावरील काश्मिरी घर, वरून अलगद होणारा हिमवर्षाव आणि छोटी काश्मिरी होडी (शिकारा) हळूहळू चालवत येणारे दाढीवाले एक गृहस्थ! वेशभूषेवरून ते मुसलमान आहेत हे दिसून येत होते. होडीसुद्धा अशी काही संथगतीने आणि लयीत चालत होती की, ती खरोखरच पाण्यावर चालत आहे असेच वाटत होते. होडी त्या घराजवळ थांबते. हे घर असते जम्मू-काश्मीरच्या एलओसीवरील खानपोरा या गावात. पार्श्वभूमीवर काश्मिरी संगीत चालू असते! हे दृश्य पाहून प्रेक्षक नाटकात गुंतून जातो आणि मग सुरू होतो एक जबरदस्त झपाटून टाकणारा अनुभव.

या नाटकाचे गुजरातीतून मराठीत केलेले भाषांतर खूपच छान झालेले आहे. त्यात मधून मधून वापरलेले हिंदी उर्दू शब्द काश्मिरी वातावरण निर्माण करतात. मोहम्मद, श्यामलाल, अन्वर आणि झेलम ही या नाटकातील प्रमुख पात्रे. सगळे एकमेकांशी अपरिचित. ते काही घटनांमुळे एकत्र येतात आणि या नाटकाचे कथानक फुलत जाते. कथानक उत्कंठावर्धक आणि खुर्चीवर खिळवून ठेवणारे आहे. काश्मिरी तरुणांची पिढी, मग हिंदू असोत की मुस्लीम, किती संघर्षमय जीवन जगत आहे, या पिढीतील काही तरुणांचे भवितव्य राजकारणी आणि टोकाच्या धार्मिक अस्मिता गोंजारणाऱ्या शक्ती यांच्यामुळे कसे दिशाहीन होत आहे याचा लेखाजोखा 'सफरचंद'मध्ये अत्यंत संयतपणे आणि ठामपणे सादर केलेला आहे. आतंकवादी हे सुद्धा मनुष्यप्राणीच आहेत आणि त्यांना देखील भावभावना असतात आणि त्या व्यक्त केल्या जाऊ शकतात हे अगदी चांगल्या पद्धतीने नाटकात प्रस्तुत केले आहे. या नाटकाचे दिग्दर्शन खूपच चांगले आहे. या नाटकातील फिरता रंगमंच मुख्यतः दोन दृश्यं उभी करतो. ती अप्रतिम झालेली आहेत. सफरचंदाच्या झाडावर चढून फळे तोडणारा मनुष्य रंगमंचावर पाहाणं हा वेगळाच अनुभव. काश्मिरी घर आणि परिसर डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा करण्यात नेपथ्य विभाग अगदी शंभर टक्के यशस्वी झाला आहे. मधून मधून लकेर घेणारे संगीत आवश्यक तिथे कमी-जास्त होते, त्यामुळे संवादात अडथळा येत नाही आणि ते सर्व प्रसंगांना अनुरूप असेच झाले आहे.






प्रकाश योजनाही खूप चांगली आहे. फिरत्या रंगमंचाचा सेट जेव्हा बदलतो तेव्हा काही क्षण काळोख केला असता तर चालले असते असे वाटते. वेशभूषाकार, मेकअप आर्टिस्ट यांनी आपले काम चोख बजावले आहे. संवाद परिणामकारक आणि कथानकाला गती देणारे आहेत.

या नाटकातील कलाकार शर्मिला शिंदे, प्रमोद शेलार, संजय जमखंडी, अमीर तडवळकर, अक्षय वर्तक, रुपेश खरे, राज आर्यन आणि शंतनु मोघे आहेत. या सर्वांनी जीव ओतून भूमिका केलेल्या आहेत. भूमिका छोटी असो अथवा मोठी, आपआपल्या भूमिकेला आणि नाटकाच्या संहितेला त्यांनी अगदी समरसून न्याय दिलेला आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हे नाटक आतंकवादाच्या विरोधात एक खूप चांगला संदेश देऊन जाते. आतंकवादी कृत्य कोणत्याही धर्माच्या माणसाने केले तरी ते आतंकवादी कृत्य असते आणि त्यापासून परावृत्त व्हावे हा संदेश यातून मिळतो. तसेच मानवता, प्रेम यांच्या साहाय्याने चांगले सुंदर असे जग निर्माण करता येते, असा संदेश यातून मिळतो. परंतु काही बाबी खटकल्या. या नाटकात गांधीजींनी देशाची फाळणी घडवून आणली असे एक वाक्य आहे, हे वाक्य वास्तवाला धरून नाही. कारण गांधीजींचा फाळणीला विरोध होता परंतु अतिउजव्या शक्ती फाळणीला गांधीच जबाबदार होते असा दुष्प्रचार करीत आहेत. त्या प्रसाराला पोषक असे हे वाक्य वाटले. ज्याप्रमाणे या नाटकात दहशतवादाचे खंडन केलेले आहे; तसेच या फाळणीविषयीच्या दुष्प्रचाराचेसुद्धा खंडन करता आले असते आणि उजव्या शक्तीच्या प्रचाराला यथायोग्य उत्तर देता आले असते. या नाटकात हिंदू मुलगी मुसलमान अतिरेकी बनून लढते असे दाखवले आहे. तसेच काश्मिरातील मुस्लीम दहशतवादी बनून पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांना ठार करत आहेत असेही दाखवले आहे. हे असे काही ऐकलेले नसले तरी ड्रामॅटिक लिबर्टी म्हणून स्वीकारता येईल. असो. या बाबी वगळता, नाटक भन्नाट झाले आहे. अगदी वेगळी अनुभूती देणारे आहे आणि आजच्या विद्वेषाने भरलेल्या आणि भारलेल्या वातावरणात प्रेम, बंधुभाव जपण्याचा, धार्मिक सलोखा राखण्याचा संदेश देणारे आहे. या संदेशाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी आणि काश्मीरविषयी निर्माण केले गेलेले गैरसमज दूर करण्यासाठी हे नाटक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. विशेष म्हणजे या नाटकास 'माझा' पुरस्कार, झी नाट्य गौरव पुरस्कार, राज्य नाट्य पुरस्कार, मटा पुरस्कार, सांस्कृतिक कला दर्पण पुरस्कार अशा एकूण २१ पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे. तेहेतिसाव्या नाट्य स्पर्धेत या नाटकाने प्रथम पारितोषिक मिळवले आहे. यावरून हे नाटक किती जबरदस्त आहे, याची कल्पना येऊ शकेल.

**नाटक : सफरचंद**

**लेखिका : स्नेहा देसाई**

**निर्माते : भारत ठक्कर, प्रविण भोसले, अजय कासुर्डे**

**दिग्दर्शक : राजेश जोशी**

**विशेष आभार : मीनाक्षी निंबाळकर**

•

**#I_AM_SORRY**
**#MANIPUR**

महा.अंनिस.



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत,** पालघर
९८२३२८०३२७

**सामाजिक न्याय दिन**

**खोपोली (रायगड) :** महा.अंनिस खोपोली शाखेच्या वतीने सामाजिक न्याय दिनानिमित्त शांतता व सद्भावना यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शांतता व सद्भावना यात्रेचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकापासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापर्यंत होता. या यात्रेत सामाजिक ऐक्याच्या घोषणा, घोषणा फलक विशेष लक्ष वेधत होते. समारोपाच्यावेळी पथनाट्य सादर करण्यात आले.

**पनवेल :** शाहू जयंती निमित्त समता फेरीचे आयोजन दि. २५ जून रोजी केले होते. ही फेरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापासून सुरुवात करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापाशी त्यांचा समारोप करण्यात आला. पनवेल शाखा, संविधान प्रचारक, ग्रामस्वराज समिती, कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन, राष्ट्रसेवा दल, ग्राममित्र, सर्वोदय, मिशन माणुसकी, फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ, संबोधी फाऊंडेशन अशा संस्था यात सहभागी होत्या.

**नवी मुंबई :** सामाजिक न्यायदिना निमित्ताने 'सामाजिक न्याय' या विषयावर दि.२४ जून रोजी, विद्यादीप विद्यालय, नवी मुंबई येथे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी अशोक निकम यांचे व्याख्यान झाले.

**मुंबई :** जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन व राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्यायदिन निमित्ताने स्काऊट गाईड सेंटर शिवाजी पार्क येथे महा.अंनिस व नशाबंदी मंडळातर्फे जनजागृती प्रबोधन यात्रा व पथनाट्य कार्यक्रम झाला. विजय परब यांनी राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक विचार व नंदकिशोर तळाशिलकर यांनी व्यसन, व्यसनाधीनता व त्यावरील उपचार यावर मांडणी केली.

**नाशिक :** लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने शासकीय अध्यापिका महाविद्यालय, नाशिक येथे वैज्ञानिक दृष्टिकोन व चमत्कार प्रात्यक्षिक सादरीकरण व सत्यशोधन कार्यक्रम राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे यांनी सादर केला.

**सानपाडा :** सामाजिक न्याय दिनानिमित्ताने 'सामाजिक न्याय' या विषयावर दि.२६ जून, रोजी डॉ. सी. वि. सामंत माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, नवी मुंबई येथे अशोक निकम यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक व उप. मुख्याध्यापिका यांचे विशेष सहकार्य मिळाले.

**भंडारा :** महा.अंनिसच्या वतीने सामाजिक न्यायदिनानिमित्त भंडारा येथे वृक्षारोपण, आरोग्य तपासणी व लहान मुलांना शालेय भेटवस्तू देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकला भोपे होत्या. या कार्यक्रमाला विष्णुदास लोणारे, युवराज खोब्रागडे, नरेश आंबिलकर, नितेश बोरकर, प्रतिम चव्हाण, संतोष राऊत, भिवा देशकर, माधुरी राऊत व कल्याणी देशकर उपस्थित होते. यावेळी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक, मुलांची तसेच नागरिकांची आरोग्य तपासणी डॉ. विश्वजीत थुलकर यांनी केली. या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**चंद्रपूर :** जुरा येथील जगदगुरू तुकोबाराय सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शाहू महाराज जयंतीचा कार्यक्रम मराठा सेवासंघाचे तालुकाध्यक्ष दिनेश पारखी, सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंटचे मुख्य संघटक बळीराज धोटे, महा.अंनिस चंद्रपूरचे जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी बळीराज धोटे, पी. एम. जाधव यांनी मार्गदर्शन केले. महा.अंनिसचे उपाध्यक्ष भास्कर सपाट, वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दत्तात्रेय मोरे, चांदागड फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संचालक लक्ष्मण घुगुल, मधुकर मटाले, ॲड.



मारोती कुरवटकर, ॲड. संतोष कुळमेथे, अमोल राऊत, प्रा. मधुकर रागीट, धीरज मेश्राम, दिलीप गिरसावळे, जगदीश पिंगे, श्रीकृष्ण वडस्कर, विनोद बोबडे, बापुराव मडावी, धर्मु नगराळे, अभिलाष परचाके, कैलास उराडे, आसिफ सय्यद, रामकिसन पारखी उपस्थित होते. संभाजी साळवे यांनी आभार मानले.

**लासूर :** लासूर स्टेशन येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १४९ वी जयंती साजरी करण्यात आली. यात्रसंगी डॉ.विकास संगेकर, गोविंद हिवाळे, प्रशांत दाभाडे, मच्छिंद्र पानकर, भास्कर बनसोडे, प्रकाश सोनवणे, कल्पेश गायकवाड, वाल्मिक बळी इ. उपस्थित होते. यात्रसंगी 'राजर्षी शाहू महाराज' यांचा विचाराचा जागर केला.मच्छिंद्र पानकर यांनी आभार मानले.

**गडचिरोली :** महा. अंनिस कार्यालयात छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक न्यायदिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महा. अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते गोविंदराव ब्राह्मणवाडे, प्रा. विजया मने, विलास निंबोरकर, पुरुषोत्तम ठाकरे, प्रा. विलास पारखी, सौ. महानंदा निंबोरकर आदी उपस्थित होते. या प्रसंगी सौ. विजया मने यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यांनी प्रियंका निंबोरकर तर आभार पूजा तम्मेवार यांनी मानले.

**अलिबाग :** छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहाने आदर्श शाळा वायशेत येथे साजरी केली. संदीप वारगे यांनी प्रास्ताविक केले. यावेळेस विद्यार्थ्यांची रंगभरण स्पर्धा घेऊन त्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच शाखेचे कार्यकर्ते पानसकर व ज्योती पाटील यांनी शाहू महाराजांच्या जीवनचरित्राबद्दल माहिती सांगितली. नितीन राऊत यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग करून दाखवले. यावेळी एस.एन.राऊत, पानस्कर, निर्मला फुलगावकर, ज्योती पाटील, श्रद्धा शहा आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी अमोल नागावकर यांनी सूत्रसंचालन तर मुख्याध्यापक महेश ठाकूर यांनी आभार मानले.

**धुळे :** निमगूळ येथे छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. महा.अंनिसचे पदाधिकाऱ्यांनी यांनी शाहू महाराज यांच्या कार्याला उजाळा दिला. २६ जून जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून बाबरे, ता. धुळे येथील शेतकऱ्यांना सोबत घेऊन दिलीप खिवसरा यांनी एकत्रितपणे चर्चा केली.

**बकरी ईदनिमित्त रक्तदान अभियान**

**पनवेल (रायगड) :** विविध समविचारी संघटनांच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात 'कुर्बानी देऊ स्व-रक्ताची, वारी ही जीवनदानाची' असे आवाहन करण्यात आले होते. या शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळाला. ५० हून अधिक जण यात सहभागी झाले. शिबिरास, पनवेलमधील प्रसिद्ध उद्योजक व राजकीय व्यक्तिमत्त्व प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली. महा.अंनिस शाखा पनवेल, संविधान प्रचारक, सर्वोदय, हुसेनी फाऊंडेशन, राष्ट्रसेवा दल, ग्रामस्वराज्य समिती महाराष्ट्र, ग्राममित्र, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था, मिशन माणुसकी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ या संस्थांनी हे शिबिर आयोजित केले होते.



**कोल्हापूर :** महा.अंनिस आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ बकरी ईदनिमित्त पशूची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये कालानुरूप बदल व्हावा म्हणून शनिवार, दि.१ जुलै २०२३ रोजी छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर

येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. शिबिराचे उद्‌घाटन मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. शमशुद्दीन तांबोळी यांनी केले. महाराष्ट्र अंनिसचे कृष्णात स्वाती, रामदास देसाई, प्रा. मोईन खान हे उपस्थित होते. यावेळी मोहसिन मुल्ला, दिलदार मुजावर, इरफान जमादार, वासिम जमादार, नियाज अत्तार, गुलाब अत्तार, कृष्णात स्वाती, रामदास देसाई, निशांत सुनंदा विश्वास, रूपेश कुंडले, संदीप सावंत, राखी मटकर, चारुल चव्हाण, अमृता पवार, कपिल मुळे यांनी रक्तदान केले.

**नंदुरबार :** दि.२९ जून रोजी नंदुरबार शाखा आयोजित बकरी ईदनिमित्त रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन डॉ. अ. ह. लालचंदानी यांचे हस्ते करण्यात आले. किर्तिवर्धन तायडे, वसंत वळवी, आबाजी आगळे, बलदेव वसईकर, दीपकभाऊ चौधरी, निरज जावरे, जितेंद्र खवळे आणि इतर साथींनी रक्तदानात सहभाग नोंदवला.

**सर्प विज्ञान जनजागृती कार्यक्रम**

**गडचिरोली :** दि. ८ जुलै रोजी राणी दुर्गावती कन्या शाळा, गडचिरोली येथे सर्प विज्ञान जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी शाळेचे पर्यवेक्षक पुरुषोत्तम ठाकरे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून सर्पमित्र अजय कुकडकर, सर्पमित्र सौरभ सातपुते, चेतन शेंडे, अतिथी म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे उपस्थित होते. जिल्ह्यात आढळणाऱ्या विषारी, निमविषारी आणि बिनविषारी सापांविषयी कुकडकर यांनी सखोल मार्गदर्शन केले. सौरभ सातपुते यांनी विषारी साप चावल्यानंतर वेळीच कोणती खबरदारी घ्यावी, याबद्दल प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. विठ्ठलराव कोठारे यांनी विज्ञानावर आधारित चमत्काराचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. प्रास्ताविक चेतन शेंडे यांनी तर आभार चुन्हे यांनी मानले.



**अवयवदान व मरणोत्तर नेत्रदान**

**लासूर (औरंगाबाद) :** दि. १० जूलै रोजी श्रीमती कांचनबाई हरकचंदजी मुनोत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लासूर स्टेशन येथे अवयवदान करणाऱ्या दात्याचा व मरणोत्तर नेत्रदान करणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबीयांचा सन्मान सोहळा तसेच विद्यार्थ्यांमध्ये या संकल्पनेची जाणीव, जागृती, प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने प्रबोधन करण्यात आले.

**लघुचित्रपट व पोस्टर प्रदर्शन**

**नागपूर :** शाखेतर्फे येथील क्रांती मैदानावर गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे विनामूल्य वाटप करण्यात आले. सोबतच मुलांना व्यसनावर लघुचित्रपट दाखविण्यात आला. सोबतच नशाबंदी मंडळातर्फे पोस्टर प्रदर्शनी लावण्यात आले होते. महा.अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी व्यसनमुक्तीवर चित्र प्रदर्शनी लावून विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक प्रवीण कांबळे, आदिवासी विकास विभाग सहआयुक्त नयन कांबळे, नागपूर पोलीस उपनिरीक्षक मौसमी कटरे, सेवानिवृत्त स्वास्थ्य अधिकारी डॉ. अशोक, प्रदीप गायकवाड, तर विशेष पाहुणे मा.जिंदा भगत, धम्मपाल आवळे, मा. विजयमाला रामटेके, स्मिता बडगे, सिद्धार्थ कांबळे, प्रशांत ढाकणे, आशिष फुलझेले, प्रवीण कांबळे, अमित मेंढे, प्रवीण भिंतटे, नागसेन बडगे, सूरज पाटील, प्रगती कांबळे, सोनाली गजभिये, किरण पाटील, स्मिता लोखंडे, निमा मेश्राम, ज्योती वंजारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मार्शल साक्षी बडगे तर प्रास्ताविक तमन्ना मेश्राम यांनी केले. धम्मपाल आवळे यांनी आभार मानले.

**प्रशिक्षण कार्यशाळा**

**वर्धा :** वयात येताना या कार्यशाळेचे आयोजन दि.८ जुलै रोजी वर्ध्यातील वर्धा वर्धन हाट येथील हॉलमध्ये घेण्यात आले. कार्यशाळेमध्ये 'वयात येताना' या विषयावर सविस्तरपणे शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन केले. शाखा कार्याध्यक्ष कविता राठोड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या, तर सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष अरुण भोसले यांनी केले. दि.१५ जुलै ते २१ जुलैपर्यंत वर्धा शहरातील




व आजूबाजूच्या गावांमधील शाळांच्यामध्ये जाऊन प्रत्येकाने किमान एक कार्यक्रम घेण्याचा संकल्प यानिमित्ताने केलेला आहे. द्वारका इडमवार, मंजुषा देशमुख, पद्मजा गद्देवार, प्रतिभा ठाकूर, जयश्री विरुटकर, प्रियांका होरे, ज्योती मेटे-भोसले, निखिल सुशीला मोरेश्वर, जान्हवी मेश्राम, ईशा इरपाते, ममता कुहिटे, प्राप्ती कामडी, उन्नती कामडी, तनु वाभाडे, समीक्षा घाडगे, कुशल दौलतकर, कविता लोहट, कविता ठाकूर, अरुण भोसले, राज खेळकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कविता लोहट यांनी केले.

**जाहीर व्याख्यान**

**वर्धा :** दि.२९ जून रोजी अनेकांत स्वाध्याय मंदिर सभागृहात शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १५०व्या अभ्यासवर्गाच्या निमित्ताने प्रा. जावेद पाशा (चंद्रपूर) यांचे 'आधुनिक भारताच्या निर्मितीत म.गांधींपासून शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरपर्यंतची सर्वसमावेशक भूमिका' या विषयावर भाषण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनेकांत स्वाध्याय मंदिरचे अध्यक्ष डॉ. महावीर पाटणी, शहर शाखेचे अध्यक्ष अरुणभाऊ चवडे १७व्या अ.भा.विद्रोही साहित्य संमेलनाचे संयोजक डॉ. अशोक चोपडे, कार्याध्यक्ष नितेश कराळे, नई तालीम सेवाग्राम आश्रमचे मंत्री व डॉ. प्रभाकर पुसदकर, मोहन खैरकार यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा उपाध्यक्ष अनिल मुरडीव, कॉ. यशवंत झाडे, सुधाकर मिसाळ जिल्हा महिला विभागाच्या कार्यवाह द्वारकाताई ईमडवार यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रकाश कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष अरुण भोसले, आभारप्रदर्शन सुनील ढाले यांनी केले. डॉ. हरिश पेटकर यांच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पाहुण्यांचा परिचय पंकजा गादेवार, कविता राठोड, कविता लोहट, विलास भगत, प्रितेश म्हैसकर आणि डॉ. माधुरी झाडे यांनी करून दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय भगत, राजेंद्र ढोबळे, भरत कोकावार, शुभम गोटे, ज्योती भोसले, राकेकुमार कोडापे, निखिल जवादे, डॉ. मंजुषा देशमुख, रजनी सुरकार यांनी परिश्रम घेतले.

**समतेची वारकरी दिंडी**

**बदलापूर :** विठूमाऊलीचा जयघोष, हातात भगवा झेंडा आणि डोक्यावर तुळस घेऊन गुरुवार, दि.२९ जून २०२३ रोजी कुळगाव-बदलापूर अपंग विकास संस्था, अँटी व्हायरस आर्मी, बालभवन बदलापूर, महा.अंनिस बदलापूर शाखा या समविचारी संघटना एकत्र येऊन दिव्यांगाची 'समतेची वारकरी दिंडी' आयोजित करण्यात आली. शौर्य भरडकर, वृंदा देहेरकर, सीमा चौबे, अनामिका म्हात्रे, राहुल दसरे, हार्दिक गडकर या दिव्यांगासह पूजा भरडकर, मनिषा देवकर, कालिंदी गचके, ओंकार कोते, प्रिया कोते, पवन चौबे, रवी कोळी, पुष्पा बनसोडे, सुधाकर बोरसे, मंदार जोशी, गीता गडकर सहभागी झाल्या. या समता दिंडी सोहळ्याचे आयोजन अनिल चाळके यांनी केले. या वारकरी दिंडीने दिव्यांग-धडधाकट, महिला-पुरुष, उच्चवर्गीय-मागासवर्गीय, जात-धर्माच्या भेदाभेदाची दरी नष्ट करून टाकली. बदलापूरमध्ये प्रथमच दिंडीचे शिस्तबद्ध आयोजन केल्याबद्दल विठ्ठल मंदिर देवस्थानचे सचिव अनिल पातकर यांनी समाधान व्यक्त केले.



**संवाद शिबिर**

**पनवेल :** महाराष्ट्र अंनिसमध्ये सक्रिय कार्यकर्त्यांसाठी रायगड जिल्हा कार्यकारिणी मार्फत पनवेल येथे १० व ११

जुलै रोजी संवाद शिबिर घेण्यात आले होते. या शिबिराचे प्रास्ताविक रायगड जिल्हा प्रशिक्षण विभाग प्रमुख मनोहर तांडेल यांनी केले. वैज्ञानिक दृष्टिकोन, महाराष्ट्र अंनिसची व्यापक भूमिका व पंचसूत्री या विषयांची मांडणी पनवेल शाखा कार्याध्यक्ष महेंद्र व राज्य महिला विभाग कार्यवाह आरती नाईक यांनी केली. बुवाबाजी, छद्म विज्ञान, अघोरी उपचार अशा विविध विषयांवर गटचर्चा करण्यात आली. दुसऱ्या सत्रात मनोहर तांडेल यांनी विविध चमत्कारांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. युवा विभाग राज्यकार्यवाह प्रियांकाने सांस्कृतिक अंगाने अंनिसची मांडणी केली. गीत, नाटक, नृत्य, सडक नाट्य व रिंगण नाट्य अशा विविध प्रकारांवर मांडणी करण्यात आली. पनवेल शाखेच्या वतीने सॉक्रेटिस ते दाभोलकर-पानसरे व्हाया तुकाराम हे रिंगण नाट्य सादर करण्यात आले. तेजलने 'मानसिक आरोग्य' या विषयाची मांडणी केली. राज्य कायदे विभाग कार्यवाह ॲड. तृप्ती पाटील यांनी 'जादूटोणा विरोधी कायदा' व 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' या दोन कायद्यांची मांडणी केली. मनोहर तांडेल यांनी खगोलशास्त्र या विषयाची मांडणी केली. शिबिरासाठी रायगड जिल्ह्यातून कर्जत, खोपोली, पनवेल मोहोपाडा येथून कार्यकर्ते आले होते, तर शिबिराची सांगता रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड व प्रधानसचिव सिद्धेश गोसावी यांनी केली.

**संविधान सन्मान पुरस्कार**

**नागपूर** : संविधान फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारा २०२३ करिता डॉ. भीमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मान पुरस्कार अध्यक्ष ई. झेड. खोब्रागडे यांच्या हस्ते महा.अंनिसचे जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग, उपाध्यक्ष मधुकर धंदरे, जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, जिल्हा प्रधानसचिव विनोद उलीपवार, चंद्रपूर जिल्ह्याचे



कार्याध्यक्ष पी. एम. जाधव सर, जिल्हा जोविनि कार्यवाह डॉ. कविता मते, पश्चिम नागपूर शाखा कार्याध्यक्ष संजय भलमे, कोराडी शाखेचे गुलाब साबळे, उत्तर नागपूर शाखेचे सुभाष काळे, जी.एम. शेख आदी कार्यकर्त्यांनी स्वीकारला. यावेळी महाराष्ट्र अंनिसच्या संविधान बांधिलकी महोत्सव अभियानाच्या उल्लेखनीय कार्याची ई. झेड. खोब्रागडे यांनी प्रशंसा केली.

**समविचारी संघटना संवाद**

**नवी मुंबई :** जिल्ह्यातर्फे तर्कशील सोसायटी, पंजाब या समविचारी संघटनेतील पदाधिकाऱ्याशी संवाद करण्यात आला. संवादसत्र १८ जून, २०२३ रोजी नवी मुंबई येथे पार पडले. तर्कशील सोसायटी पंजाबचे सोशल मीडिया प्रभारी संदीप धारीवाल भोजा यांच्याशी संवाद करण्यात आला. महा. अंनिसची स्थापना व संघटनेच्या विविध पातळ्यांवर चालणाऱ्या कामाची ओळख करून देण्यात आली. जादूटोणाविरोधी कायद्याची माहिती, 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या संघटनेच्या मुखपत्राची माहिती देण्यात आली. भोजा यांनी तर्कशील सोसायटीच्या कामाचे स्वरूप सांगितले. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात आपण परस्परांच्या संपर्कात राहून काम करूया असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. सदर संवाद सत्रात गजानंद जाधव, महेंद्र राऊत, प्रदीप कासुर्डे, अरूण जाधव व अशोक निकम सहभागी झाले होते.

**भेंडा, नेवासा :** 'अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ मजबूत करण्यासाठी समितीत नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबिरे घेऊन त्यांना वैज्ञानिक, कायदेशीर व वैचारिक पातळीवर सक्षम केले जाईल', असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी केले. भेंडा येथे आयोजित करण्यात आलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या भेंडा, सौंदाळा, तरवडी, कुकाणा, चिलेखनवाडी जेऊर गावातील कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्यकार्यवाह कॉ. बाबा आरगडे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे, नगरचे जिल्हाध्यक्ष प्रमोद भारुळे, डॉ.अशोकराव ढगे, यशवंत पाटील, साहित्यिक भाऊसाहेब सावंत, पत्रकार सुखदेव फुलारी, अनिल गर्जे, नबाब शहा, डॉ. संतोष फुलारी, कॉ. आप्पासाहेब

वाबळे, राजेंद्र गवळी, सुधाकर नवथर, नानासाहेब खराडे आदी उपस्थित होते. भाऊसाहेब सावंत यांनी आभार मानले.

**चमत्कार प्रशिक्षण शिबिर**

**मुंबई :** दि. २५ जून रोजी महाराष्ट्र अंनिस मुंबई जिल्ह्यांतर्गत चमत्कारामागील विज्ञानाचे प्रशिक्षण सानेगुरुजी विद्यालय, दादर येथे घेण्यात आले. शाळेचे संचालक मोहाडीकर यांनी शाळेतील हॉल उपलब्ध करून दिला होता. राज्य प्रधानसचिव नंदकिशोर तळाशिलकर, जिल्हा युवा विभाग कार्यवाह रूपेश व जिल्हा प्रशिक्षण विभाग कार्यवाह तुषार हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. निर्मला मॅडम यांनी 'कोणी कितीही शिकला, साधं विज्ञान विसरला' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात केली. उपस्थित प्रशिक्षकांची निलेश, प्रियांका व प्रवीण यांनी ओळख करून दिली. तुषारने 'बुवाबाजी भांडाफोड' या विषयावरील संघटनेची व्यापक व वैचारिक भूमिका स्पष्ट करत चमत्कार प्रात्यक्षिके दाखविली. नंदनाने शाखांना जोडून घेण्याचे आवाहन सर्वांना केले. कार्यक्रमाची सांगता करत प्रवीणने उपस्थितांचे आभार मानले. या दरम्यान, दहिसर व कुर्ला शाखेमार्फत पुस्तक विक्री करण्यात आली.



**दुर्बिण बनविण्याचे प्रशिक्षण**

**वर्धा :** महा.अंनिस वर्धा तालुका व जिल्हा शाखेतर्फे २ जुलै २०२३ रोजी दुर्बिण बनविण्याचे प्रशिक्षण घेण्यात आले. हे प्रशिक्षण राज्य विज्ञान मराठी परिषदचे अमरावती जिल्हा अध्यक्ष तथा वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग अमरावतीचे कार्यवाह प्रवीण गुल्हाने यांनी दिले. विद्यार्थ्यांमध्ये प्रयोग करण्याची आवड निर्माण व्हावी, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि खगोलीय घटनांचे निरीक्षण त्यांनी करावे, या हेतूने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन खगोल अभ्यासक प्रा. किशोर वानखेडे यांनी तर अध्यक्षस्थानी महा.अंनिस वर्धा तालुका अध्यक्ष अरुण भाऊ चवडे होते. अतिथी म्हणून राष्ट्रसेवा दलाचे मोहन भाऊ खैरकार, महिला विभागाच्या डॉ.मंजुषा देशमुख होत्या. प्रा. किशोर वानखेडे यांनी दुर्बिणचा शोध, गॅलिलिओचे संशोधन याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा प्रधानसचिव सुनील ढाले, परिचय राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार, प्रास्ताविक वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे राज्य सहकार्यवाह प्रकाश कांबळे यांनी, तर आभार प्रा. प्रितेश म्हैसकर, निखिल सुशीला मोरेश्वर यांनी मानले.

कार्यशाळेत सांची कांबळे, सुहानी ढाले, अबीर मेश्राम, कबीर वानखेडे, सांची वाणी, श्वस्वत जंगले, योगीराज गिरडे, सुनीत कदम, शौर्या कुर्वे, स्पशिका सोनटक्के, स्निधि बनकर, स्वेता चौदरी, आस्था पाटील, सानवी कोकावार, हिमांशू कोडापे, भूषण खैरकार, पूर्व धामत या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी भरत कोकावार, दिनेश वाणी, प्रनोज बनकर, प्रवीण जंगले, तनु वराडे, डॉ. माधुरी झाडे, कविता राठोड आदींनी सहकार्य केले. या कार्यशाळेत येऊन प्रत्यक्ष दुर्बिण बनवायला मिळाली यांचा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

**विवेक संवादमाला**

**कुर्ला :** 'ब्रेकअप के बाद' हा विषय घेऊन दि. ८ जुलैला 'प्रेम व हिंसा' या विषयावर ऑनलाईन संवाद घडविण्यात आला. ब्रेकअपनंतरच्या नेमक्या भावना, मुलांचं व मुलींचं ब्रेकअप यातील फरक, नकारानंतरची हिंसा, प्रेम आणि आकर्षण इत्यादी मुद्द्यांवर उपस्थितांनी मत मांडले. महा.अंनिस राज्य युवा सहभाग कार्यवाह प्रियांकाने विवेचन केले. यावेळी ३५ पेक्षा जास्त साथी जॉईन झाले होते. सूत्रसंचालन तुषार, प्रास्ताविक ज्योती, गाणे नंदना, आभार प्रसाद तर तांत्रिक जबाबदारी प्रवीणने पार पाडली.

●


# गणितप्रेमी

**सूरज उर्मिला सुनील**

नुकताच येऊन गेलेला ‘२२ जुलै (२२/७)’ हा गणितप्रेमींचा आवडता दिवस. २२/७ ही संख्या गणितात ‘पाय ($\pi$)’ या संख्येच्या आकडेमोडी करताना वापरतात. जग बदलून टाकणाऱ्या संकल्पनेबद्दल २२ जुलै हा दिवस 'Pi approximation day' म्हणून साजरा करण्यात येतो. $\pi$ म्हणजे वर्तुळाचा परीघ आणि व्यास यांच्या लांबींचा भागाकार. ही अपरिमेय संख्या असल्याने तिची अचूक किंमत सांगता येत नाही. २२/७ ही $\pi$ ची अंदाजे किंमत आहे. वर्तुळ ही सर्वात सममितीय (symmetrical) आकृती असताना त्यासंबंधी वापरली जाणारी संख्या अपरिमेय आहे, हे निसर्गातील आश्चर्यच म्हणावे लागेल.




अश्मयुगातील चाकाचा शोध लागल्यापासून $\pi$ चा अभ्यास न वापर सुरू झाला असे मानले जाते. त्यानंतर माणूस विविध वर्तुळाकार वस्तू बनवू लागला. $\pi$ वापरून कुंभाराची भांडी, वाहने, घड्याळ, पुलाखालील कमानी अशा आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या हजारो वस्तू माणूस बनवू लागला. फक्त एका संख्येमुळे मानवसृष्टीचा इतका विकास झाला. १८९७ साली अमेरिकेतील एका राज्यसरकारने आकडेमोड सोपी करण्यासाठी $\pi$ ची किंमत ३.१४१९... ऐवजी ३.२ करायचा प्रयत्न केला होता. मित्रांनो, आपल्याला हा बदल छोटा वाटतो, पण ३.२ वापरून आपण घड्याळ बनवले तर ते दिवसाला ४ मिनिटे मागे पडेल, बांधकामे कोसळतील इतका मोठा हा बदल आहे. गणित निसर्गाचे सत्य सांगते. आपण त्यात बदल करू शकत नाही.



$\pi$ ही अपरिमेय संख्या असली, तरी तिची जास्तीतजास्त दशांश स्थळापर्यंत किंमत काढायचा प्रयत्न गणितज्ज्ञ करत आलेले आहेत. एव्हरेस्ट सर करणे, चंद्रावर पाऊल ठेवणे याप्रमाणेच $\pi$ ची किंमत शोधायची स्पर्धा दिसते. इजिप्तिशियन संस्कृतीमध्ये $\pi$ ची ३.१६ अशी किंमत सापडली होती. भारतीय गणितज्ज्ञ आर्यभट्ट यांनी ३.१४१६ ही किंमत शोधून अचूकता वाढवली. ग्रीक गणितज्ज्ञ आर्किमिडिज यांनी ही किंमत शोधण्यासाठी एक पद्धत शोधली. ती वापरून पुढील दशांश स्थळापर्यंतचे योग्य अंक मिळू लागले. न्यूटनने कॅलक्युलस या शाखेचा शोध लावल्यापासून पुढील अंक वेगाने सापडू लागले. या सर्वांनी $\pi$ ची किंमत कशी शोधली याची माहिती इंटरनेटवरून नक्की घ्या. सध्या $\pi$ ची किंमत शोधण्यासाठी जे सूत्र वापरले जाते ते गणितज्ज्ञ रामानुजन यांनी शोधून काढले आहे. ते पुढीलप्रमाणे,

$$\frac{1}{\pi} = \frac{2\sqrt{2}}{9801}\sum_{k=0}^{\infty}\frac{(4k)!(1103+26390k)}{(k!)^4 396^{4k}}$$

कॉम्प्युटरच्या मदतीने हे सूत्र वापरून ६२ ट्रिलियन दशांश स्थळांपर्यंत $\pi$ ची किंमत शोधण्यात आलेली आहे!




**कोडे क्र. ९**


काडेपेटीच्या काड्यांपासून एक त्रिकोण बनवायला तीन काड्या लागतात; पण दोन त्रिकोण बनवायला पाच काड्या पुरतात (दोघांची एक बाजू सारखी घेऊन). असे एकाच मापाचे सात त्रिकोण बनवायला कमीत कमी किती काड्या पुरतील? तुमच्या उत्तराचा फोटो (९४२३३९५०९७) या व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवा.

**कोडे क्र. ८ चे उत्तर:**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८ | ७ | ४ | १ | ५ | ९ | ६ | २ |
| ४ | ९ | २ | ७ | ६ | ३ | १ | ८ | ५ |
| ५ | १ | ६ | ९ | २ | ८ | ३ | ७ | ४ |
| ८ | २ | ३ | १ | ५ | ७ | ४ | ९ | ६ |
| १ | ६ | ९ | २ | ८ | ४ | ७ | ५ | ३ |
| ७ | ५ | ४ | ३ | ९ | ६ | २ | १ | ८ |
| ९ | ४ | ८ | ६ | ७ | २ | ५ | ३ | १ |
| ६ | ३ | १ | ५ | ४ | ९ | ८ | २ | ७ |
| २ | ७ | ५ | ८ | ३ | १ | ६ | ४ | ९ |

## विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. १३

**– उत्तम जोगदंड**



**आडवे शब्द:**

१) व्हाट्सॲप सारखे एक सोशल मीडिया ॲप

२) भारत आणि श्रीलंकेत विवेकी चळवळ सुरू करणारे श्रीलंकेतील एक प्रखर बुद्धिवादी

४) सत्यशोधक समाजाचे संस्थापक, महात्मा

६) टेलीफोनचा शोध लावणारे शास्त्रज्ञ

९) इजिप्तच्या पिरामिड्स मधील राजघराण्यातील व्यक्तीचा जतन केलेला मृतदेह

१०) लाट

१२) गूगलचा वेब ब्राउजर

१३) सैनिकांना पुरवले जाणारे अन्न, दारूगोळा इत्यादि

१४) शेतातल्या पिकामधील गवत काढण्याचे काम

१६) अर्थसंकल्पात उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्यास उत्पन्न होणारी स्थिती

१७) फळांच्या आतील मधुर भाग

१८) पावसाळ्यात दगड इत्यादीवर साठणारा हिरवा पदार्थ. यावरून पाय घसरू शकतो

१९) ब्रिटनमधील एक गणितज्ञ ज्याने रिफ्लेक्टर टेलिस्कोप मध्ये लक्षणीय सुधारणा केली

२१) दारूबंदीवरील राम गणेश गडकरी यांचे नाटक एकच

२२) एक मध्यकालीन कवी, सेनापति, प्रशासक, आश्रयदाता, दानवीर, कूटनीतिज्ञ, बहुभाषाविद, कलाप्रेमी आणि विद्वान

२३) आकाशात उडणारे जीव

२४) या पुलावर दहा वर्षांपूर्वी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या झाली.

**उभे शब्द**

२) भारताच्या पुरातत्व खात्याचा ब्रिटिशकालीन पहिला महानिदेशक

३) आदिमानवाने शिकार करण्यासाठी हे वापरले

४) वनस्पतींच्या या भागांमध्ये परागकण असतात

५) फुले, आंबेडकर आणि मार्क्सवादाच्या अमेरिकी वंशाच्या भारतीय अभ्यासक

६) भारतातील प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ

७) वजन मापाचे मेट्रिक पद्धतीचे एक परिमाण

८) मुस्लिम सत्यशोधक समाजाचे संस्थापक

११) पीक यावे म्हणून बीजाची ही करावीच लागते

१५) घाटातील रस्त्यांवर पावसाळ्यात ही कोसळते

२०) फेब्रुवारी महिन्यात २९ दिवस असलेले वर्ष

२१) बुद्धिबळातील एक छोटी सोंगटी

(उत्तर पुढील अंकात)

### विवेक–विज्ञान शब्दकोडे १२ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १जे | आ | र | डी | २टा | टा | | ३क | बी | ४र |
| म्स | | | | य | | ५द | डे | | त्ने |
| वे | | ६वि | व | र | | या | | ७च | |
| ८ब | फ | | | | ९आ | नं | द | व | १०न |
| स्पे | | ११लि | पी | | | द | | | य |
| स | | न | | १२लु | १३ई | स | ब्रा | १४उ | न |
| १५टे | ले | क्स | | १६ई | थ | र | | त्क्रां | |
| लि | | | १७शे | पा | | १८स्व | १९ना | ती | २०त |
| स्को | | २१भू | | श्च | | २२ती | र | | र |
| २३प | क्षी | | २४स | र | की | | ळ | | स |

**माधव बावगे :** विवेकी जोडीदारामुळे जीवन अधिक समृद्ध होईल. संघटनेच्या माध्यमातून सातत्याने प्रबोधन आणि कृती केली जात आहे. प्रेमाच्या उदात्त भावना जपल्या पाहिजेत आणि विवेकी जोडीदारासाठी आग्रही असले पाहिजे.

**लेशपाल जवळगे :** मुलींच्यावर हल्ले करण्याच्या विकृत मनोवृत्तीचा धिक्कार केला पाहिजे. मी कर्तव्य भावनेतून त्या मुलीवर होणारा हल्ला रोखला.

**सुनील रेडेकर :** पालकांनी मुलामुलींना समानतेने वाढवल्यास निकोप दृष्टिकोन तयार होईल. महिलांवरील अत्याचार, शोषण याचा निषेध केलाच पाहिजे.

**संजय बनसोडे :** प्रेमाचा व्यापक आणि वैश्विक दृष्टिकोन जाणून घेतला पाहिजे. अहिंसा हा प्रेमाचा मूलाधार आहे. जीवापाड प्रेम करतो म्हणायचे आणि जीवावर उठायचे ही विकृत मनोवृत्ती संपवली पाहिजे.

## परिषदेमध्ये संमत केलेले ठराव

१. प्रेम ही अत्युच्च दर्जाची मानवी भावना आहे. त्यात हिंसेला थारा नाही. कोणत्याही पातळीवरच्या हिंसेचा आम्ही तीव्र निषेध करतो. आम्ही स्वतः हिंसक वर्तन करणार नाही, हिंसेचे समर्थन करणार नाही. हिंसा घडत असल्यास रोखण्याचा प्रयत्न करू.

२. काही वेळा तरुणांमध्ये प्रेमातून घडणाऱ्या हिंसक घटनांचे मूळ कारण प्रेम, आकर्षक आणि वासना या तीन भावनांमधील गोंधळ हे आहे. त्यामुळे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणात शास्त्रशुद्ध लैंगिक शिक्षण व समुपदेशनचा समावेश करण्यात यावा, अशी आग्रही मागणी या परिषदेत आम्ही करीत आहोत.

३. प्रेम प्रकरणातून होणाऱ्या हिंसेच्या बहुतेक घटनांमध्ये स्त्री हीच बळी असते. यामागे असलेली पुरुषी वर्चस्वाची व स्वामित्वाची मानसिकता बदलून स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य रुजविणे, त्यायोगे माणूस म्हणून स्वीकार आणि परस्परांच्या मताचा आदर यासाठी विविध उपक्रमांद्वारे तरुणाईचे प्रबोधन करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

४. स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी लव्ह-जिहादसारखे भ्रम तयार करून दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करणे व त्यातून हिंसा घडवून आणण्याच्या विकृत मानसिकतेचा आम्ही जाहीर निषेध करतो. प्रेम ही जात-धर्म-भाषा-प्रांत निरपेक्ष मानवी मूल्य आहे. त्यात वरील संकुचित बाबींना थारा नाही. त्यामुळे लव्ह-जिहादसारख्या भ्रम आणि अफवांना आम्ही बळी पडणार नाही.

५. महिलांवरील हल्ले, बलात्कार, अन्य अत्याचाराबाबत गांभीर्याने दखल घेऊन ती प्रकरणे जलद गती न्यायालयात चालवून अशा प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे.

६. महाविद्यालय स्तरावर प्रेम आणि लैंगिक शिक्षण याबाबत युवक-युवतींच्या संवाद शाळा घेण्यात याव्यात.

७. शाळा, महाविद्यालये, शिकवण्या, बस स्टँड अशा ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवली पाहिजे.



Registered News Paper
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd.No.SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409, Published and Posted on 5th August 2023

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष पहिले अंक अकरावा, ५ ऑगस्ट २०२३ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 1 Issue 11, 5th August 2023 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
व्यक्तीसाठी रु. ४००/–
संस्थेसाठी रु. ५००/–

## वर्षभरात विशेषांकासह ११ मासिक अंक मिळवा घरपोच

वर्गणीदार तसेच देणगी/ जाहिरात देऊ इच्छिणाऱ्यांनी विवेक जागर संस्थेच्या खालील अकाउंट नंबरवर रक्कम जमा करावी.

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
वर्गणीदार/देणगीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R

- रक्कम जमा केल्यानंतर व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर (९३५९०८०८२०) यांच्याशी संपर्क करणे.
- आपल्या सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. पोस्टाने अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास व्यवस्थापकीय संपादकाकडे संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrikagmail.com, manspatrikamans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामामध्ये सहभागी होण्यासाठी खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.**

| राज्य प्रधानसचिव | | | | | राज्य कार्याध्यक्ष | राज्य अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| नंदकिशोर तळाशीलकर | गजेंद्र सुरकार | डॉ. टी. आर. गोराणे | संजय बनसोडे | | माधव बावगे | अविनाश पाटील |
| ९८६९१७००६२ | ९४०४८९१७२२ | ९४२०८२७९२४ | ९८५०८९९७१३ | | ९४०४८७०४३५ | ८९७५१३०६०९ |

**कार्यालयीन पत्ता**
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली – ४१५४० (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.